दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

# ऑपरेशन सिंदूरचे उद्दिष्ट

## डीजीएमओ: १०० अतिरेकी ठार

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी ज्या क्रूरतेने २६ निष्पापांचे जीव घेतले, याची आपल्याला कल्पना आहे. त्यामुळे दहशतवादाचे कट आखणा-यांना शिक्षा करणे



आणि त्यांच्या दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करणे हे लष्करी उद्दिष्ट ठेवून ऑपरेशन सिंदूरची संकल्पना मांडण्यात आली होती. त्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याची माहिती डीजीएमओचे राजीव घई यांनी दिली. भारतीय सेनेच्या कारवाईत ३५ ते ४० पाकिस्तानी सैनिकांचा खात्मा झाला तर दहशतवादी तळांवरील हल्ल्यांत १०० हून अधिक दहशतवादी मारले गेल्याचे त्यांनी सांगितले.

सशस्त्र दलाच्या पत्रकार परिषदेत डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई आणि एअर मार्शल ए. के. भारती यांनी ऑपरेशन सिंदूरची तपशीलवार माहिती दिली. एअर मार्शल ए. के. भारती म्हणाले की, ७ मे रोजी इतर कोणत्याही पायाभूत सुविधा, विशेषत: पाकिस्तानी नागरी किंवा लष्करी आस्थापनांना टाळून, दहशतवाद्यांना आणि त्यांच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे हे उद्दिष्ट होते. हे ध्येय साध्य करण्याच्या अचूकतेवर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले की, अनेक हवाई क्षेत्रे आणि डंपवर हवेतून वारंवार पाकिस्तानकडून हल्ले झाले, जे सर्व हाणून पाडण्यात आले. अहवालानुसार ७ ते » पान २ वर

# चर्चेसाठी विशेष अधिवेशन बोलवा

## चर्चेतले:राहुल गांधी यांचे पंतप्रधानांना पत्र

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिल्ली:भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाल्याच्या दुस-याच दिवशी रविवारी लोकसभा आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून चर्चेसाठी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली. सध्याची परिस्थिती, ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम दहशतवादी हल्ला यावर चर्चेसाठी विशेष अधिवेशन बोलवावे, असे पत्रात म्हटले आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि पहिल्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जाहीर केलेला शस्त्रविराम यावर चर्चा करणे हे लोकांसाठी आणि त्यांच्या प्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्यासमोर येणा-य आव्हानांना तोंड देण्यासाठीचा आपला सामूहिक निर्धार दाखवून देण्याची ही एक संधी असेल. त्यामुळे तात्काळ विशेष अधिवेशन बोलवावे, असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधानांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही पंतप्रधान मोदी यांना वेगळे पत्र लिहिले असून, राहुल गांधी यांच्या मागणीला या पत्रातून पाठिंबा दर्शवला असून, सरकारने तातडीने विशेष अधिवेशन बोलावणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

दहशतवादी हल्ला झाल्यानंतर काँग्रेसने केंद्र सरकारच्या निर्णयांना अधिकृतपणे पूर्ण पाठइंबा जाहीर केला होता. परंतु भारत-पाकिस्तान यांच्यातील चर्चेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याच्या मुद्यावर आता काँग्रेसकडून सरकारला घेरले जाऊ शकते. भारत-पाकिस्तानमधील वाटाघाटींत कोणत्याही तिस-या पक्षाचा हस्तक्षेप होणार नाही, याची सरकारने काळजी घेतली. मग ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा कशी केली, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# भारताने जिंकली ट्रॉफी

## गयजमान श्रीलंका पराभूत



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने श्रीलंकेच्या मैदानात रंगलेल्या तिरंगी मालिकेतील फायनलमध्ये यजमान श्रीलंकेला ९७ धावांनी पराभूत करत ट्रॉफी जिंकली आहे.

या दोन संघांशिवाय या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सहभाग होता. आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना स्मृती मानधनाच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ३४२ धावांचा डोंगर उभारून लंकेसमोर ३४३ धावांचे टार्गेट सेट केले होते.या धावांचा » पान २ वर




# युद्धामुळे महासंकटात सापडले

## देशविदेश:पाकिस्तानवर ३० अब्ज डॉलर्सचे कर्ज

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:युद्धामुळे महासंकटात सापडलेल्या पाकिस्तानची संपूर्ण अर्थव्यवस्था सध्या कर्जाच्या कुबड्यांवर सुरू आहे. १९५८ मध्ये पहिल्यांदा पाकिस्तानने कर्ज घेतले होते, तेव्हापासून ते आतापर्यंत तब्बल २४ वेळा पाकिस्तानने आयएमएफकडे कर्जासाठी हात पसरले आहेत. एवढेच नाही तर पाकिस्तानने इतर




परदेशी बँकांकडून देखील मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे. सध्या पाकिस्तानवर तब्बल ३० बिलियन डॉलर एवढे कर्ज आहे आणि त्यांना पुढील दोन वर्षांमध्ये ते परतफेड करावे लागणार आहे. पण पाकिस्तानची सध्याची स्थिती पाहता ते दोन वर्षांत कर्ज फेडू शकणार नाहीत.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव वाढला. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा जळफळाट झाला. त्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताने पाकिस्तानचा हल्ला परतवून लावला. प्रत्युत्तर म्हणून भारताने केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानचे प्रचंड नुकसान झाले. मात्र तरीदेखील पाकिस्तानच्या कुरापती सुरूच आहेत. दरम्यान आयएमएफकडून पुन्हा एकदा पाकिस्तानला १०० कोटी डॉलरचे कर्ज देण्यात आले. आधीच पाकिस्तान कर्जबाजारी झाली आहे. त्यात आयएमएफचे १०० कोटी डॉलर्सचे कर्ज यामुळे पाकिस्तान पूर्णपणे कर्जात बुडाला आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानला पुढील दोन वर्षांत हे सर्व कर्ज फेडायचे आहे. त्यामुळे कंगाल पाकिस्तानच्या अडचणी वाढणार् आहेत.

खरे तर भारत आणि पाकिस्तानला एका दिवसाच्या अंतराने स्वातंत्र्य मिळाले. मात्र, भारताने आज मोठी भरारी घेतली तर पाकिस्तानला दहशतवादाने पोखरून काढले आहे. दहशतवाद आणि अंतर्गत कलहामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. सध्या त्यांची विदेशी गंगाजळी बांगलादेशपेक्षाही कमी आहे. पाकिस्तानला आयएमएफकडून तसेच इतर राष्ट्रांकडून जे फंडिंग मिळाले, ते विकास करण्यासाठी मिळाले. मात्र पाकिस्तानने त्याचा उपयोग दहशतवाद्यांना पोसण्यासाठी केला. त्यामुळे पाकिस्तान कर्जबाजारी बनला आहे.

### युद्धात अब्जावधी डॉलर्सचा फटका

पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांना मोठा फटका बसला आहे. एअरस्पेस आणि विमानतळ बंद असल्याने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेची गती एकदम मंदावली. भारत-पाक संघर्षादरम्यान पाकिस्तानला अनेक अब्ज डॉलरचे नुकसान झाले. अर्थात अजून अधिकृत आकडेवारी काही समोर आली नाही. पण पाकिस्तानची अर्थव्यवस्था कोलमडली. आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या विशेष पॅकेजची पाकिस्तान वाट पाहत आहे.

# लाडकी बहिणींचा वाद

## स्पष्टीकरण:इतर खात्यांचा निधी वळवला नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महाराष्ट्र सरकारची बहुचर्चित लाडकी बहीण योजनेवरून वाद निर्माण झाला आहे. लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी



वळवण्यात आला, असा आरोप सामाजिक आणि आदिवासी विकास खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला. यावर योजनेतील वरिष्ठ अधिका-यांनी स्पष्टीकरण दिले.

अधिका-यांचे म्हणणे आहे की, प्रधानमंत्री आवास योजना आणि ग्रामीण रस्ते योजनांसारख्या केंद्र सरकारच्या योजनांमध्येही ही प्रक्रिया अवलंबली जाते. विशेष गटांसाठी चालवल्या जाणा-या योजनांना पुरेसा निधी मिळावा म्हणून यावेळी समाजकल्याण खात्यात ४२ टक्के वाढ करण्यात आल्याचे राज्य सरकारचे म्हणणे आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यापैकी २८ हजार २९० कोटी रुपये सर्वसाधारण अर्थसंकल्पातून ३ हजार ९६० कोटी रुपये अनुसूचित जाती कल्याण विभागाला आणि ३ हजार २५० कोटी रुपये आदिवासी कल्याण विभागाला देण्यात आले.

### निधी विभागण्याची सामान्य पध्दत

लाडकी बहीण योजनेतील अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला नाही. यावर कोणत्याही मोठ्या योजनेचे बजेट विविध खात्यांमध्ये विभागले जाण्याची सामान्य पद्धत आहे. सामाजिक आणि आदिवासी कल्याण विभागाला या योजनेअंतर्गत विशिष्ट गटांसाठी (अनुसूचित जाती आणि जमाती) निधी वाटप करण्यात आला. परंतु, हा निधी फक्त त्या लाभार्थ्यांवरच खर्च करता येईल, अशी अट आहे.

## युद्धविरामहराम!

जित्त्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, जब गिदड की मौत आती है तब वो शहर की ओर भागता है, नमकहराम, युद्धविरामहराम अशी कितीतरी विशेषणे दिली तरी ती विश्वासघातकी पाकिस्तानसाठी कमीच पडतील. पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताशी युद्ध छेडणा–या पाकिस्तानने खरपूस मार मिळाल्यानंतर आणि दाणादाण उडाल्यानंतर शनिवारी (१० मे) दुपारी 'युद्ध नको'चे पांढरे निशाण फडकावत भारतासमोर सपशेल लोटांगण घातले आणि शस्त्रसंधी करण्याची विनंती केली. भारताला दहशतवादाचा बंदोबस्त करायचा होता, त्यांनी केलेल्या कृत्याबद्दल त्यांना कडक शिक्षा द्यायची होती, चांगला धडा शिकवायचा होता. ते उद्दिष्ट साध्य झाल्यामुळे सशर्त अटीनुसार भारताने युद्धविराम करण्यास होकार दिला. संध्याकाळी पाच वाजल्यापासून दोन्ही देशांत युद्धबंदी झाल्याची घोषणा करण्यात आली. तीन दिवसांच्या तीव्र संघर्षानंतर भारत–पाकमध्ये शस्त्रसंधीवर सहमती झाली होती. मात्र त्याचवेळी यापुढे भारताविरोधात कुरापती न करण्याची सज्जड ताकीदही देण्यात आली होती. कोणतीही अतिरेकी कृती झाल्यास (अॅक्ट्स ऑफ टेरर) ती 'अॅक्ट्स ऑफ वॉर' समजली जाईल अशा स्पष्ट शब्दांत पाकला बजावण्यात आले होते.

शस्त्रसंधी करताना भारताने कोणत्याही अटी–शर्ती मान्य केलेल्या नाहीत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने संध्याकाळी सव्वा सहा वाजता युद्धबंदीची अधिकृत घोषणा केली. त्याच्या काही मिनिटे आधी पाकचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक डार यांनी पाकिस्तान आणि भारत यांच्यात तात्काळ युद्धविराम करण्यास सहमती झाल्याचे सांगितले होते. शस्त्रसंधीसाठी अमेरिकेने मध्यस्थाची प्रमुख भूमिका बजावल्याचे सांगण्यात आले असले तरी द्विपक्षीय चर्चे तूनच तोडगा निघाल्याची भूमिका भारताने घेतली होती. भारत–पाकिस्तान यांच्यात होत असलेला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्यावर सहमती झाली आहे. कुठल्याही स्वरूपातील दहशतवाद सहन केला जाणार नाही. त्याविरोधातील कारवाईबाबत तडजोड केली जाणार नाही, ही भूमिका भारताने सातत्याने घेतली आहे. ही भूमिका कायम राहील असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले होते. इतके सारे स्पष्ट होऊनही अखेर पाकिस्तानने 'पालथ्या घड्यावर पाणी' घातलेच! युद्धविरामानंतर अवघ्या तीन तासांत पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन करत आपली लायकी दाखवली. रात्री काश्मीर, राजस्थान, पंजाबमध्ये पाकिस्तानी सैन्याने गोळीबार आणि ड्रोन हल्ले करून युद्धबंदी मोडली. संध्याकाळी ५ वाजता युद्धबंदी सुरू झाल्यानंतर पंजाब, राजस्थान आणि काश्मीरच्या सीमारेषेवरील दुकाने सुरू झाली. स्थानिक लोकांची बाजारपेठेत वर्दळ सुरू झाली होती.

मुले खेळण्यासाठी मैदानात उतरली होती. मात्र, रात्री साडेआठपासून पाकिस्तानी लष्कराने युद्धबंदीचे उल्लंघन करून श्रीनगरसह विमानतळ, लाल चौक, राजौरी, बारामुल्ला, सांबा, वैष्णोदेवी मंदिर परिसर, मेंढर, अखनूर, फिरोजपूर, उधमपूर, पोखरण, रामगढ, अबडासा, जखाऊ, बाडमेर, नलिया लष्करी विमानतळ, कच्छ, जैसलमेर भागात शेकडो ड्रोनद्वारे हल्ला केला. मात्र, सावध असलेल्या भारतीय जवानांनी सारे ड्रोन हवेतच नष्ट केले. कारवाईवेळी या भागासह जम्मू, पठाणकोट, अमृतसर आणि भूजमध्ये सायरन वाजवत ब्लॅक आऊट करण्यात आले. अखनूर, राजौरी, बारामुल्ला आणि सांबा सीमेवर पाकिस्तानी लष्कराने तोफगोळ्यांसह गोळीबार केला. युद्धबंदीनंतरही पुन्हा तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे लोकांमध्ये एकच गोंधळ उडाला. या हल्ल्यानंतर रात्री ११ वाजता परराष्ट्र मंत्रालयाचे विदेश सचिव विक्रम मिस्त्री यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन केल्याचे आणि आपल्या जवानांना कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगितले.

युद्धबंदी करताना भारताने स्पष्ट केले आहे की, सिंधू जलवाटप करार स्थगितच राहील. भारताने पाकिस्तानवर लादलेले निर्बंधही कायम राहतील. पहलगाममधील दहशती हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात अनेक राजनैतिक निर्णय घेतले असून जलवाटप कराराला स्थगिती दिली आहे. पाकने पुन्हा एकदा चिथावणीखोर आणि तणाव वाढवणारी कारवाई केली आहे. पूंछमधील गुरुद्वारावरही त्यांनी हल्ला केला, त्यात गुरुद्वारातील काही बांधवांचे प्राणही गेले. परंतु भारतीय सैन्य आणि हवाई दल आपल्याच शहरांवर हल्ले करत आहे आणि पाकिस्तानला दोष देण्यात येत आहे असा कांगावाही पाकने केला आहे. जगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न पाक नेहमीच करतो. त्याची ही जित्त्याची खोड आहे. पाकिस्तानातील नानकाना साहिब गुरुद्वारावर भारत ड्रोनहल्ले करत असल्याचा दावाही पाकने केला आहे. हाही पाकिस्तानच्या अपप्रचाराचाच एक भाग आहे. पहलगाम हल्ल्यापासून पाकिस्तानने ही मोहीम सुरू केली आहे. सुरुवातीपासूनच ते अशा गोष्टींना धार्मिक रंग देत आहेत. पाकने जम्मूतील शंभू मंदिरावरही हल्ला केला.

# दहशत घालणाऱ्या टोळीवर मोक्का !

## दणका:परळी व अंबाजोगाई भागात कारवाई

पुण्यभूमी पुण्यभूमी

बीड: जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधोक्षक नवनीत कॉवत यांनी आपले प्रयत्न चालवले आहेत. जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरी समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चउजउ व चझऊव कलम ५५,५६,५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा त्यांचा पर्यन्त आहेच.बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे.जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत.

दि. ०१/०३/२०२५ रोजी न्यायालयाचे आदेशान्वये पो.स्टे. परळी शहर गुरनं ४४/२०२५ कलम ३०७, ३२६,३९२, ३९४,३२३, ३२४, ५०४,५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयातील फिर्यादी सहदेव वाल्मीक सातभाई वय २८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. तडोळी ता. परळी जि. बीड हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता तडोळी येथुन परळी वै. येथे ट्रॅक्टरचे काम करण्यासाठी व हप्ता भरण्यासाठी घरातुन २,७०,०००/– रुपये घेवुन मोटार सायकलवर परळी येथील शिवाजी चौकामधुन सातबारा आणण्यासाठी जलालपुर रोडवरील तलाठी कार्यालयाकडे मोटार सायकलने जात असतांना जलालपुर रोडच्या कमानीजवळ मो. सा. समोर पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ चक–४४–न–०८०६ आडवी लावुन आरोपी रघुनाथ फड व ईतर ७ ते ८ जण असे सर्व जण वेळूच्या काठ्या व लोखंडी रॉड घेवुन खाली उतरले व फिर्यादीस गाडीवरुन ओढुन खाली पाडले. रघुनाथ फड म्हणाला की, याला मारा याला सोडु नका भडवा लई माजला आहे असे म्हणाला. त्यावेळी ईतर आरोपीतांनी फिर्यादीस खाली पाडुन तोंडावर पाठीवर काठीने सपासप मारहाण केली व जखमी केले. लोखंडी रॉड़ने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारले. त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाला. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस फरशी उचलुन जिवे मारण्याचे उद्देशाने मारहाण केली. यात फिर्यादीचा डावा पाय फैक्चर झाला. त्यावेळी रघुनाथ फड व इतरांनी फिर्यादीचा मोबाईल व पॅन्टच्या खीशातील २,७०,०००/– रुपये रोख काढुन घेतले फिर्यादी जोरजोरात ओरडल्याने जमाव जमला. तेंव्हा आरोपी स्कॉर्पिओ गाडीतुन निघुन गेले. जातांना म्हणाले की, तु आता वाचलास परंतु नंतर आम्ही तुला जिवंत सोडणार नाहीत अशी धमकी देवुन निघुन गेले वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन हा गुन्हा उीझउ कलम १५६ (३) अन्वये न्यायालयाचे आदेशाने दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे तपासात परळी शहर पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन गन्ह्यातील मख्य आरोपी टोळी प्रमख नामे आरोपी टोळी प्रमुख नामे रघुनाथ रामराव फड वय ३० वर्षे रा.रामनगर ता. परळी जि. बीड यास दिनांक ०७/०३/२०२५ रोजी अटक केली. तसेच गुन्ह्यातील आरोपी क्र. २) जगन्नाथ विक्रम फड वय ४५ वर्षे रा. बजरंग नगर परळी वै. जि. बीड. ३) सुदिप रावसाहेब सोनवणे वय २८ वर्षे रा. सिध्दर्थ नगर परळी वै. जि. बीड. ४) बालाजी अंकुश दहीफळे वय २४ वर्षे रा. माणिक नगर परळी वै, जि. बीड. ५) विलास बालाजी गिते वय २७ वर्षे रा. नंदागौळ ता. परळी वै. जि. बीड. यांना दिनांक २८/०३/२०२५ रोजी २०.३४ वा.

अटक करुन तपास करण्यात आला व गुन्ह्यातील ०२ आरोपी फरार आहेत. या टोळीने आज पावेतो संघटीतरीत्या पो, स्टे. परळी शहर, संभाजीनगर व अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत एकुण १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यात खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, जबरी चोरी करणे, अवैद्य शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, दरोडा टाकणे, रस्ता आडवीणे, मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणने, गंभीर दुखापत करणे या सारखे गंभीरस्वरुपाचे गुन्हे केले आहेत. प्रस्तावात एकुण १० गुन्हे विचारात घेण्यात आले. त्यापैको ०९ गुन्हयांची दखल न्यायालयाने घेतलेली असुन ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे.

सर्व गुन्हे १० वर्षांच्या आतील असुन ०३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र आहेत. या टोळीचा टोळी प्रमुख याने स्वतःच्या व टोळीतील इतर सदस्यांच्या आधीक फायदयासाठी हे गुन्हे केल्याचे पोलीस अधीक्षकांच्या चानाक्ष नजरेतुन लपुन राहीले नाही. त्यावरुन बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन या प्रकरणांत तपासी अधिकारी पोनि रघुनाथ नाचण पो.स्टे. परळी शहर यांनी अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई व उपविपोअ अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली या टोळी विरुध्द मोक्का कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करुन दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना सादर केला होता. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०४/०५/२०२५ रोजी प्रस्ताव आपले शिफारशीसह विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला होता. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०७/०५/२०२५ रोजी नमूद संदर्भीय गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलमांचा अंतर्भाव करण्याची परवानगी दिल्याने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणांचा पुढील तपास अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी.अंबाजोगाई यांचेकडे दिला आहे. मोक्का कायदयाचे कलम ३(१) (ळळ).३(२),३(४) समाविष्ठ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई हे सदर गुन्हयांचा पुढील तपास करीत आहेत.तसेच नमूद गुन्हातील न्यायालयाकडून जामीन मंजुर झालेल्या ०४ आरोपींचे जामीन रद्द करण्यासाठी तपास अधिकारी यांनी प्रस्ताव न्यायालयात सादर केले आहेत. ही कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि रघुनाथ नाचण, सपोनि योगेश शिंदे पो. अं. पंडीत पांचाळ, धनश्री भताने, किशोर घटमळ पो. स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, निलेश ठाकुर, विभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केली आहे. भविष्यातही शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळयावर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्ती विरुध्द तसेच बीड जिल्ह्यात धुमाकुळ घालणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्का व एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांनी दिले आहेत.

## पान एक वरून

**ऑपरेशन सिंदूरचे**

१० मे दरम्यान नियंत्रण रेषेवर तोफखाना आणि लहान शस्त्रांच्या गोळीबारात पाकिस्तानी सैन्याचे अंदाजे ३५ ते ४० जवान मृत्युमुखी पडले असल्याचे म्हटले जात आहे.पाकिस्तानने लहान ड्रोन आणि यूएव्हीद्वारे भारताच्या लष्करी तळांना आणि हवाई पट्टयांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. परंतु आपल्या हवाई संरक्षण यंत्रणेने प्रत्येक हल्ला हाणून पाडला. सीमेपलिकडून होणा–या गोळीबाराला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. या कारवाई दरम्यान भारतीय सैन्याने केवळ नियंत्रण रेषेवर ३० ते ४० पाकिस्तानी सैनिक आणि अधिकारी मारले, असे डीजीएमओ घई यांनी सांगितले.

**भारताने जिंकली**

पाठलाग करातना श्रीलंका महिला संघ ४८.३ षटकात २४५ धावांत आटोपला. गोलंदाजीत भारताकडून स्नेह राणा हिने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तिच्याशिवाय अमनजोत कौरनं ३ विकेट्स आणि नल्लापुरेड्डी श्री चरणी हिने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# वाळू माफियाकडून तहसीलदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न

## तहसीलदाराने गोळीबार केल्यामुळे जीव वाचला

गेवराई/प्रतिनिधी

गेवराई हद्दीतील खामगाव येथील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करताना अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांनी बंदुकीतून दोन ते तीन राऊंड हवेत फायर केल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी ७:१० वाजता घडली. या प्रकरणातील कारवाई आणि तहसीलदारांचा व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

प्रत्यक्षदर्शींनुसार, खामगावच्या नवीन पुलाखाली तीन ट्रॅक्टर अवैध वाळू वाहतुकीत गुंतले होते. यापैकी एक स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर वाळू भरून जात असताना तहसीलदार चव्हाण आणि त्यांचे कर्मचारी स्कॉर्पियो गाडीत उभे होते, पण त्यांनी हा ट्रॅक्टर अडवला नाही. त्यानंतर दुसऱ्या ठिकाणी दोन ट्रॅक्टरपैकी एक वाळू भरून निघाला होता, तर दुसऱ्यावर वाळू भरण्याचे काम सुरू होते. यावेळी तहसीलदारांनी १०० ते १५० फूट अंतरावरून हवेत गोळीबार केला , ज्यामुळे ट्रॅक्टर चालक पळाले.

विशेष म्हणजे, गेवराई हद्दीत घडलेल्या या घटनेनंतर जप्त वाहन गेवराई तहसील कार्यालय किंवा पोलिस ठाण्यात न नेता अंबडला नेण्यात आले. गोळीबारासारख्या गंभीर घटनेनंतर तक्रार दाखल करण्यासाठी गेवराई पोलिस ठाण्यात न जाता गोंदी पोलिस ठाण्यात जाण्याचा तहसीलदारांचा निर्णय प्रश्न निर्माण करतो. तहसीलदारांचा गोळीबार संनाट असल्याचे प्रथमदर्शी सांगितले जात असून, गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होण्याची अपेक्षा होती.या प्रकरणाने तहसीलदारांच्या कारवाईच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. स्थानिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी होत आहे. तहसीलदार चव्हाण रविवारी संध्याकाळपर्यंत गोंदी पोलिस ठाण्यात होते, पण त्यांच्या कारवाईवर संशय कायम आहे.



## पान सहा वरून

**बुद्ध विहारात धम्म संस्कार**

तत्त्वज्ञानाची गरज आहे.यावेळी राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, किसन तांगडे, ड.सुरेश वडमारे, डी. जी. वानखेडे, अरुणराव कागदे, विष्णु वाघमारे, रणजित क्षीरसागर, प्रशांत वासनिक, ड. तेजस वडमारे, प्रा. राम गायकवाड, बापू पवार, रमेशराव सोनवणे, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, मिराताई कागदे, गयाबाई उजगरे, अलकाताई कांडेकर, अरुणाताई आठवले, संगीता वडमारे, ज्योतीताई वीर, उषाताई सोनवणे, कलावती गंगाधरे, शोभा जोगदंड, गवळण वडमारे, महेश आठवले, दयानंद उजगरे, नाना मस्के, विलास जोगदंड, भारत कांबळे, सुभाष तांगडे, भैय्यासाहेब मस्के, भैय्यासाहेब साळवे, अक्षय कोकाटे, शाम वीर, महेंद्र वडमारे, प्रभाकर चांदणे, महेंद्र कांबळे, मनोज बोराडे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, संजय हनवते, सोनू वडमारे, प्रभाकर जोगदंड, दिपक ओव्हाळ, बाळु कांडेकर, गौरी वडमारे, पप्पू साळवे, कपिल साळवे, नामदेव वाघमारे,संजय कागदे, अजिंक्य वडमारे, चिंटू वडमारे, समाधान जाधव यांच्यासह या कार्यक्रमास सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच उपासक–उपासिका उपस्थित होते.

**कळंबमध्ये चोरट्यांनी घर**

टाळाटाळ करत आहेत तरी याकडे पोलीस निरीक्षक श्री रवी सानप साहेब यांनी तेथील कर्मचारी यांना समज द्यावी असे नागरीकांमध्ये चर्चा होताना दिसत आहे तसेच मागील अनेक वर्षापासून चोरट्यांचा आणि मटका,जुगार,सट्टा असे अनेक अवैध धंदे राजरोसपणे कळंब शहरात सुरू आहेत त्यामुळे शहरात उद्रेक असूनही पोलिसांना या टोळीचा शोध घेता आलेला नाही. यावरून पोलिसांनी निष्क्रियता दिसून येते. शहरातील चोऱ्या थांबणार का? त्यामुळे पोलिस नेमकी गस्त करतात का? नाही व कुठे कशी? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे याकडे पोलीस निरीक्षक श्री रवी सानप साहेब यांनी लक्ष देण्याची गरज आहे असे नागरीकामधुन बोलले जात आहे.

**पवनचक्की कंपन्यांना विरोध**

आपली व्यथा मांडली परंतु त्यांना न्याय देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी असमर्थता दाखवली. त्यामुळे जे जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या जमिनी कंपन्यांच्या ताब्यात देण्यासाठी अमर्याद अधिकार वापरते ते प्रशासन शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची आस्थेवाईकपणे चौकशी करत नाही आणि लोकप्रतिनिधी याबद्दल चकार शब्द काढत नाहीत हि शोकांतिका असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

**राहुरीत खिस्ती भजन**

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील दुर दुरून आलेल्या भजनी मंडळाची स्पर्धेसाठी चुरस लागली होती. ना भूतो न भविष्यती अशी ही स्पर्धा संपन्न झाली.. या स्पर्धे प्रसंगी मुंबई अहिल्यानगर येथील परीक्षक लाभले होते. या स्पर्धेत एक अनोखा नवा विक्रम सर्वांना अनुभवास मिळाला. तो म्हणजे निकालाची पारदर्शकता.. आतापर्यंत महाराष्ट्रातही कुठे झाला नाहीं राज्यस्तरीय खिस्ती भजन स्पर्धा यशस्वीतेसाठी सेन्ह सदन चर्च राहुरी व आराधना भजनी मंडळ सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले

**सैनिकाचा एक मॅसेज**

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना तिकीट बुकींग करण्याबाबत काही मदत होईल का, या भावनेने दि.१० रोजी मॅसेज केले. मॅसेजनंतर अवघ्या तीस सेकंदात खा.सोनवणे यांनी करपे यांनी कॉल करून काय मदत करावी, असे म्हणत त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यानंतर तातडीने रेल्वेबोर्डला लिहले. सदरील पत्र रेल्वेविभागाचे विभागीय कार्यालय,फैजपुर येथे पाठविण्यात आले. यानंतर तातडीने त्यांना दि.११ मे रोजीची बुकींग मिळाली. दि.११ रोजी सकाळी करपे यांच्या पत्नी, दोन मुले ट्रेममध्ये बसवून गावी पाठविण्यात आले. यावेळी विशाल करपे यांनी सैनिकाच्या मदतीला खासदार आले, याबाबत आभार मानले.

**गेवराई शहरात तिरंगा**

गेवराई शहरात मोटारसायकलवरून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली होती, यावेळी जय भारत, जय जवन जय किसान या घोषणांनी अक्षरशः गेवराई शहर दणाणून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधानाच्या प्रस्तावनेला पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरुवात करुन शास्त्री चौक येथे लालबहादूर शास्त्री यांना पुष्पहार अर्पण करून, शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण करून रॅलिचा समारोप केला यावेळी किशोर भोले, अर्जून सुतार, अमोल सुतार, अॅड. सोमेश्वर कारके, ज्ञानेश्वर हवाले, भारत हवाले,प्रकाश भोले, छगण खरात, माणिक राठोड, किशोर चव्हाण,बप्पासाहेब काळे, शिवाजी केदार, विकास गायकवाड, प्रशांत केदार,सुनिल चव्हाण, नितिन खापरे, देवेंद्र धुरंधरे, कृष्णा हतागळे, साईनाथ सुतार, सतिष नाडे, सिध्दार्थ शेजुळ, महादेव निकाळजे, सतिश निकाळजे, अंकुश बनसोडे, संतोष पवार, कैलास बनसोडे, अतुल हतागळे, चरणदास हतागळे, अमोल पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**नायदेवीत आरओ फिल्टरचे**

इंगळे, अख्तर भाई, आमीर भाई सुलतानपूर, राज इंगळे, वकीलभाई, जिल्हा उपाध्यक्ष तथा नायदेवी उप सरपंच अरविंद खंडारे, भिमराव अवसरमोल, सागर तायडे महसुल विभाग, समर्पन इंगळे, सुनील खरात पोलिस पाटील, विद्यानंद कस्तुरे, संजय बगाडे माळीमहासंघ सत्यशोधक समिती सचिव, अतुल तायडे, विश्वदीप तायडे, प्रविण तायडे, विष्णू घनमोडे, दीपक धुरंधर, तंटामुक्त अध्यक्ष मानसिंग भाऊ सोळंके, पाणी पुरवठा समिती अध्यक्ष तेजरावभाऊ तायडे हरिभाउ तायडे, सुर्यप्रकाश तायडे, जिवन तायडे, सुमित पवार, निर्मलाबाई वाकोडे, देवानंद वाकोडे, सुनिल सोळंके, शिवा डाबेराव, भिमराव बोरकर, काळेसर खामगाव, गायकी सर खामगाव, अणिल तायडे, दीनकर वानखेडे, अमर तायडे, गौतम सरदार, पंकज तायडे, प्रशिक मिसाळ, गवई परिवार, कडुबा तायडे, विनोद सावदेकर शेगाव जवळा, भगवान कोल्हे, पवन कोल्हे, संजु तोंडे, प्रल्हाद पाटेखेडे परिवार,अमोल डाबेराव, गुलाब देशमुख, साहेबराव दौलत तायडे, साहेबराव बोरकर, संतोष तायडे, धम्माल तायडे, प्रविण प्रल्हाद तायडे, निरंजन खंडारे, प्रशांत तायडे, अमोल भा तायडे, मिलींद तायडे, आकाश तायडे, आमोल गौतम तायडे, ज्ञानू तायडे, प्रदीप हीवराळे, शैलेस राजेश तायडे, प्रमेश्वर वाकोडे, गणेश इंगळे इ तसेच गावातील महिला मंडळ व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ईटकूर येथे उप डाकघराचे**

सरकारच्या सेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.या पोस्ट ऑफिसमधून ग्रामस्थांना सुविधा आता गावातच मिळणार आहेत सर्व डाक योजना लाभ डीबीटी फॉर्म भरून थेट खात्यात पैसे,सुकन्या योजना,विमा योजना,५४९ रुपयांमध्ये १० लाखांचा विमा कवच,आधार दुरुस्ती सुविधा यामुळे या भागातील लोकांना तालुक्याला जाण्याची गरज भासणार नाही असेच उपडाकघर प्रत्येक जिल्हा परिषद गटात करण्यासाठी प्रयत्न असेल असे छत्रपती संभाजी नगर सहाय्यक डाक निदेशक एक.के.शेख यांनी सांगितले.

**सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान**

कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते. नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विद्युत रोषणाईने सजविण्यात येते. यात्रेत आलेले विविध मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्ष वेधून घेतात. कड्यांची मौलाली बाबांची यात्रा हिंदू–मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, कड्यांची यात्रेत सामाजिक एकोप्याचे अनोखे दर्शन पाहावयास मिळते. हा यात्रोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी, यात्रा कमिटी, ग्रामस्थ, पोलिस प्रशासन सर्वजण एकत्रित परिश्रम घेतात. हेच मौलाली बाबांच्या यात्रोत्सवांचं खास वैशिष्ट्य मानलं जात आहे.

संपादक : बाळासाहेब भगवान मस्के, कार्यकारी संपादक : सुनिल मसू डोंगरे
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत्रात दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी



## शिवसेनेत आलेल्या माजी नगरसेवकांचे स्वागत

**ठाणे :** शिवसेनेचे प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कळवा येथील सात माजी नगरसेवकांनी गुरुवारी शिवसेनेचा भगवा हाती घेतला, तर आणखी दोन माजी नगरसेवक लवकरच शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करतील अशी चर्चा आहे. दरम्यान नव्याने प्रवेश घेतलेल्या राष्ट्रवादीच्या सात माजी नगरसेवकांचा सत्कार खारीगाव शिवसेना शाखेच्या वतीने नुकताच घेण्यात आला. नव्याने पक्षात आलेले माजी विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, माजी विरोधी पक्षनेत्या प्रमिला केणी, माजी नगरसेवक महेश साळवी, माजी नगरसेविका सुरेखा पाटील, माजी नगरसेविका मनाली पाटील, माजी नगरसेविका मनीषा साळवी, माजी नगरसेवक सचिन म्हात्रे, मंदार केणी, रमेश पाटील आदींचा यावेळी खा. डॉ. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के, कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांच्या हस्ते जंगी स्वागत व सत्कार करण्यात आले यावेळी डॉ. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के, यांनी आपले मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मा. नगरसेवक उमेश पाटील, मा. महिला संघटक लता पाटील नगरसेवक राजेंद्र साप्ते, मा. उपमहापौर मनोज लासे, मा. नगरसेविका विजया लासे, मा. नगरसेविका अनिता गौरी,प्रियांका पाटील, शिवसेना मा. नगरसेवक गणेश कांबळे यांच्यासह शिवसेनेचे कळवा खारीगाव, विटावा, येथील सर्व पदाधिकारी शिवसैनिक, महिला आघाडी उपस्थित होते.

# युद्धजन्य परिस्थितीत जिल्हा प्रशासन सज्ज

सुरक्षित निवारागृहांसह सर्व यंत्रणा अद्ययावत ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

सध्या देशात असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर जिल्हा प्रशासनाने भर दिला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी प्रशासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सुरक्षित निवारागृहांची निवड करून ती सर्व सोयीसुविधांनी सज्ज ठेवण्याचे तसेच नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याचे निर्देश दिले. यासोबतच सायरनची नियमित तपासणी करणे, जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणे



निश्चित करून त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेची तातडीने पाहणी करणे यावर त्यांनी विशेष भर दिला. पत्ती व्यवस्थापनाच्या काळात सामाजिक संस्थांचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता, त्यांच्याशी संबंधित माहिती अद्ययावत ठेवण्याचे आदेशही त्यांनी दिले. जीवनावश्यक वस्तू व साहित्याची यादी तयार करून पुरवठादारांची माहिती अद्ययावत ठेवण्यासोबतच, आपल्या विभागाशी संबंधित सर्व माहिती तातडीने अद्ययावत करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. 'आता प्रत्येकाने जबाबदारीने वागण्याची वेळ आहे. देशासाठी आणि समाजासाठी एकजुटीने काम करण्याची ही वेळ आहे. सर्वांनी आपले कर्तव्य ओळखून पूर्ण तयारी करावी. जशी वेळ येईल, तसे आपले कर्तव्य बजावण्यासाठी मागेपुढे पाहू नका, 'असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केले. त्यांनी पुढे सांगितले की, सर्वांना रजेवरून पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश देण्यात आले असून, आता ही आपल्या सर्वांच्या 'परीक्षेची वेळ' आहे, त्यामुळे प्रत्येकाने सर्व प्रकारे सज्ज राहावे. या महत्त्वपूर्ण बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि पोलीस सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी आपापल्या विभागाच्या तयारीबाबत माहिती दिली आणि जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, सुनील पवार, अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, सर्व प्रांताधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव, महानगरपालिकांचे उपायुक्त, कार्यकारी अभियंता सुनील पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ, भारतीय भू-सेना व वायुसेनेचे प्रतिनिधी अधिकारी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एकंदरीत, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने घेतलेली ही तातडीची बैठक आणि जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले निर्देश, जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

संस्था, माजी सैनिक संघटनांना प्रशासनाचे आवाहन

## मनुष्यबळ, संसाधनांची सविस्तर माहिती तातडीने सादर करा




◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

जिल्ह्यातील सामाजिक संस्था, विविध प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि माजी सैनिक संघटना यांच्याकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि इतर संसाधनांची सविस्तर माहिती तातडीने सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, सर्व महापालिका आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांच्यासह जिल्हा प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले आहे. ही माहिती संबंधित तालुक्याचे तहसिलदार आणि महानगरपालिका क्षेत्रातील संस्थांनी महानगरपालिकेचे उपायुक्त यांच्याकडे पुढील तीन दिवसांत पोहोचती करावी, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून हे महत्त्वपूर्ण आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आणि कोणत्याही आवश्यक परिस्थितीत तातडीने मदत पोहोचवण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. सामाजिक संस्थांच्या स्वयंसेवकांचे मोठे नेटवर्क, प्रशिक्षण संस्थांकडील कुशल मनुष्यबळ आणि माजी सैनिकांचा अनुभव व शिस्त यांचा एकत्रितपणे उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. या आवाहनानुसार, जिल्ह्यातील प्रत्येक सामाजिक संस्थेने त्यांच्या संस्थेतील सक्रिय सदस्यांची संख्या, त्यांच्याकडे असलेल्या विशेष कौशल्यांची माहिती संस्थेकडील आवश्यक उपकरणे आणि संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक सादर करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, विविध व्यावसायिक आणि कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थांनी त्यांच्याकडील प्रशिक्षित मनुष्यबळाची माहिती, जसे की कोणत्या क्षेत्रात किती प्रशिक्षित व्यक्ती उपलब्ध होऊ शकतील, त्यांची संपर्क माहिती आणि संस्थेकडे असलेल्या प्रशिक्षण सामग्रीची माहिती देणे आवश्यक आहे.

माजी सैनिक असोसिएशनने त्यांच्या सदस्यांची संख्या, त्यांच्यातील विशेष कौशल्ये त्यांच्याकडे असलेली संसाधने आणि प्रमुख सदस्यांचे संपर्क क्रमांक तहसील कार्यालयात किंवा महानगरपालिका मुख्यालयात जमा करायचे आहेत. जिल्हा प्रशासनाने या संदर्भात अधिक माहिती देताना सांगितले की, 'आपल्या जिल्ह्यात अनेक सामाजिक संस्था, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि माजी सैनिक संघटना उत्कृष्ट काम करत आहेत. त्यांच्याकडे असलेले मनुष्यबळ आणि संसाधने यांचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीत किंवा इतर कोणत्याही सामाजिक कार्यात प्रभावीपणे करता येऊ शकतो. यासाठी या सर्व संस्थांनी आणि संघटनांनी सहकार्य करावे आणि पुढील तीन दिवसांत आवश्यक माहिती सादर करावी.' प्रशासनाच्या या आवाहनाला जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्था आणि संघटना सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वेळेत माहिती सादर केल्यास जिल्हा प्रशासनाला आपत्कालीन परिस्थितीत जलद आणि प्रभावी उपाययोजना करणे शक्य होईल, यात शंका नाही. त्यामुळे, जिल्ह्यातील सामाजिक संस्था, प्रशिक्षण संस्था आणि माजी सैनिक संघटनांनी या महत्त्वपूर्ण आवाहनाची नोंद घ्यावी आणि तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन पुन्हा एकदा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## वेचक

### उद्या कल्याण-डोंबिवलीत पाणीपुरवठा बंद

**कल्याण :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांच्यातर्फे मंगळवारी (दि.१३ मे) रोजी देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कारणामुळे कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे. महावितरणच्या २२ के. व्ही. एनआरसी-२ फिडरवरील देखभाल दुरुस्तीमुळे सकाळी ९ ते दुपारी ५ या वेळेत विद्युत पुरवठा बंद ठेवण्यात



येणार आहे. या कालावधीत नेतवली जलशुद्धीकरण केंद्र, मोहिली उंदचन केंद्र व मोहिली जलशुद्धीकरण केंद्र कार्यरत राहणार नाहीत. त्यामुळे कल्याण ग्रामीण विभाग मांडा-टिटवाळा,वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी,कल्याण पूर्व-पश्चिम, डोंबिवली पूर्व-पश्चिम परिसरातील पाणीपुरवठा पूर्णतः खंडित राहणार आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेचा पाणीपुरवठा विभागाच्या वतीने नागरिकांना आव्हान करण्यात येते की, या दिवशीच्या पाणी कपातीसाठी आवश्यक पाण्याचा साठा करून सहकार्य करावे.

### मातृदिनानिमित्त 'निसर्गाला आदरांजली' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा "मातृ दिन" एका विशेष आणि अभिनव पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. आज (रविवारी, ११ मे) सकाळी ११.३० वा. ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात 'मातृदिनानिमित्त निसर्गाला आदरांजली' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात केवळ जन्मदात्या आईसोबतच जीवनाचा खरा पोषणकर्ता असलेल्या निसर्गाचेही आदराने स्मरण केले जाणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश मातृदिनाच्या पारंपरिक संकल्पनेला व्यापक करून निसर्गाच्या महत्त्वपूर्ण योगदानाला उजाळा देणे, हा आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप व पर्यावरण व वृक्षतज्ज्ञ विजयकुमार कट्टी हे मार्गदर्शन करणार आहेत. ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात होणाऱ्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात माध्यमकर्मी, पर्यावरणप्रेमी, नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय यांनी केले आहे.

### बिर्ला नाईट कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा स्टार्टअप स्पर्धेत सहभाग

**कल्याण :** बी. के. बिर्ला नाईट कॉलेजच्या Incredible Thinker या विद्यार्थ्यांच्या चमूने "SBI College Youth Ideation 2025" या राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप स्पर्धेत सहभाग घेतला. या चमूमध्ये वंश शाह, विक्रम चौधरी आणि सचिन वर्मा यांचा समावेश होता, आणि त्यांना उद्योजकता सेलचे प्रमुख डॉ. रूपेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी तांत्रिक समर्थन देण्यात धरणी मुदलियार आणि लक्ष्मी सिंग यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते, ज्यांनी विद्यार्थ्यांना सशक्त तांत्रिक



तयारीसाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली आयुररक्षा ही आरोग्यसेवा संबंधित अभिनव कल्पना सादर करण्यात आली. ही स्पर्धा तीन टप्प्यात पार पडली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रीलला ३१ हजारहून अधिक लाईक्स, शेअर्स व कमेंट्स मिळाल्या, ज्यामुळे त्यांची दुसऱ्या टप्प्यासाठी निवड झाली. दुसऱ्या टप्प्यात उत्पादन विक्री किंवा डिजिटल पिचिंगची जबाबदारी देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत टॉप १०० संघांमध्ये स्थान पटकावले. त्यानंतर त्यांना थेट आयआयटी दिल्लीमध्ये गुंतवणूकदारांसमोर सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

### आंबेळेतील ६५ वर्षीय एकनाथ धनगर बेपत्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील आंबेळे गावातील रहिवासी एकनाथ हरि धनगर वय ६५ हे घरातून ५ मे २०२५ रोजी अडीच वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून सांगून निघून गेले अद्यापपर्यंत ते घरी आले नाही. त्यांचा मोठा मुलगा महेंद्र धनगर यांच्याकडे काशिमीरा येथे मुलांना आंबे घेऊन जातो असे सांगून घरातून निघून गेले. याबाबत मुरबाड पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यांची उंची ५ फूट, नाक बसलेले, केस पांढरे, पांढऱ्या रंगाचा बाह्याचा फूल शर्ट, काळ्या रंगाची हाफ पॅन्ट, बोलीभाषा मराठी असा त्यांचा वर्णन आहे. सदरची व्यक्ती कुणास आढळल्यास त्यांनी तत्काळ मुरबाड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन मुरबाड सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुभाष जुंदरे यांच्याशी संपर्क साधावा.

## भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात प्रशासकीय यंत्रणा सतर्क

नागरिकांना शांतता राखत अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

◆ **ठाणे ( प्रतिनिधी):**

भारत-पाक सीमेवर वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी, जिल्ह्यातील सर्व महापालिका आयुक्त यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील नागरिकांना शांतता आणि सलोखा राखण्याचे, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत घाबरून जावू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातही सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणे, महत्वाच्या इमारती आणि गर्दीच्या ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासकीय यंत्रणांनी जिल्ह्यातील विविध भागात मॉक ड्रील आयोजित करून कोणत्याही अप्रिय घटनेचा सामना करण्यासाठी तयारी ठेवली आहे. जिल्ह्यात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांवर प्रशासनाकडून बारीक लक्ष ठेवले जात आहे. भारत-पाक तणावाच्या संदर्भात चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. 'ठाणे जिल्हा प्रशासन आपल्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे,' असे सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना आश्वस्त केले आहे.

## एपीएमसी मार्केटची निवडणूक पावसाळ्यानंतर घ्या

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

अवकाळी पाऊस आणि सद्यस्थितीत देशात युद्धजन्य निर्माण झाली असून या पार्श्वभूमीवर होऊ घातलेली कल्याण एपीएमसी मार्केटची निवडणूक सहा महिन्यानंतर पावसाळा संपल्यावर घेण्यात यावी अशी मागणी लक्ष्मी मार्केट भाजीपाला संघटनेने केली आहे. बाजार समितीतील संचालक मंडळाचा कार्यकाल होऊन बरखास्त झाल्यानंतर बेकायदेशीरपणे तीन वेळा मुदत वाढ घेतली. राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक घेण्याच्या हालचाली सुरू केल्या असून, बाजार समितीच्या निवडणुकीसंदर्भात व्यापारी यादी, माथाडी यादी, शेतकरी मतदार यादी, ग्रामपंचायत यादी बनविण्याचे काम सुरू केले. सद्यस्थितीत मुंबई, ठाणे परिसरात पडत असलेला अवकाळी पावसाची वस्तुस्थिती, तर दुसरीकडे सद्यस्थितीत देशात युद्धजन्य निर्माण झाली असून या पार्श्वभूमीवर होऊ घातलेली कल्याण एपीएमसी मार्केटची निवडणूक पावसाळ्यानंतर घेण्यात यावी अशी मागणी लक्ष्मी मार्केट भाजीपाला संघटनेने केली आहे.

## राष्ट्रीय लोक अदालतीत मृताच्या वारसाला दोन कोटींची भरपाई

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयात भरवण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत एका मृताच्या वारसाला २ कोटी २ लाखांची भरपाई देण्यात आली आहे. वर्षभरापूर्वी डोंबिवली स्टेशन परिसरात झालेल्या अपघातात प्रदीप नागतिलक नामक व्यक्तीचा मृत्यू झाला होता. याबाबतच्या दाव्याचा तडजोडीचा निकाल मोटर अपघात न्यायालयाच्या न्यायाधीश सोनाली शहा यांच्या पॅनेल समोर शनिवारी झाला.

विक्रोळी येथे राहणारे प्रदीप नागतिलक, वय, ४४ वर्षे हे बुलेट मोटर सायकलवरून मित्रासोबत घरी येताना अज्ञात गाडीने त्यांना हुलकावणी दिली असता दुचाकी घसरून मागे बसलेल्या नागतिलक यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. याबाबतचा दावा ठाणे जिल्हा सत्र



न्यायालयाचे मोटार अपघात न्यायालया समोर सुरू होता. हा दावा तडजोडतून निकाली काढण्यासाठी राष्ट्रीय लोक अदालतीत (दि.१०) ठेवण्यात आला असता मोटार आंबा न्यायालयाच्या न्यायाधीश सोनाली शहा, वकील प्रीती पाटील आणि वकील आशा सकपाळ यांच्या पॅनलसमोर आला असता फिर्यादीचे वकील जी ए विनोद आणि विमा कंपनीचे वकील केशव पूजारी यांनी आपसात समेट घडवून मयत नागतिलक यांच्या वारसाला ही भरपाई मंजूर करून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष श्रीनिवास अग्रवाल यांच्या हस्ते वारसाला धनादेश देण्यात आला. यावेळी जिल्हा सत्र न्यायाधीश ए एन शिरसीकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश ईश्वर सूर्यवंशी, सोनाली शहा आदी मान्यवर उपास्थित होते. ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय शनिवारी (दि. १०) राष्ट्रीय लोक अदालत ठेवण्यात आली होती. हजारो दाखल पूर्व आणि प्रलंबीत दावे निकाली काढण्यात आली.

## बेस्ट लीडरशिप पुरस्काराने देवेंद्र देशमुख यांचा सन्मान

◆ **भिवंडी (वार्ताहर):**

अँटी करप्शन बोर्ड (रजि), नवी दिल्ली ही संस्था संपूर्ण देशभर कार्यरत आहे. या संस्थेचे वार्षिक संमेलन कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया, संसद भवन मार्ग, इंडिया गेट जवळ, नवी दिल्ली या ठिकाणी संपन्न झाले. या कार्यक्रमात देशभरातून जवळपास १५० पदाधिकारी उपस्थित होते. त्यापैकी देवेंद्र दत्तात्रेय देशमुख, ठाणे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांना बेस्ट लीडरशिप पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी अँटी करप्शन बोर्ड, नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष आर. के. जैन, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री आण्णासाहेब खैरनार व अनेक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार




देऊन श्री. देवेंद्र दत्तात्रेय देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रसार माध्यमानी त्यांच्याशी संपर्क साधला असता हा माझा गौरव नसून मी केलेल्या कार्याचा गौरव आहे. याचे संपूर्ण श्रेय त्यांनी ठाणे, पुणे, पालघर आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील माझे सहकारी यांचा सन्मान आहे असे त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले. समाजातील गरजू व दुर्लक्षित समाजबांधवाना न्याय मिळवून देण्यासाठी व बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी आम्ही सरकारी योजनांचा अभ्यास करून त्या योजना बेरोजगारांना उपलब्ध करून देणे हे सुद्धा आमचं भविष्यातील कार्य असेल असेही त्यांनी आवर्जून सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे समाजातील विविध स्तरावर मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## कल्याणमध्ये ड्रोनच्या अफवेने नागरिकांमध्ये घबराट

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

कल्याण येथील आधारवाडी परिसरात आकाशात ३ ड्रोन फिरत असल्याची अफवा पसरली. यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण होते. सायरनच्या भयावह आवाजांमुळे लोकांच्या हृदयाचे ठोके जलद झालेत. कल्याणच्या आधारवाडी परिसरातील नागरिकांना आकाशात तीन ड्रोन फिरताना दिसले. आकाशात ड्रोनची हालचाल पाहिली. काही नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बाजारपेठ पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. या संदर्भात, डीसीपी अतुल झेंडे यांनी एक निवेदन जारी करून सांगितले की, पोलिसांनी संपूर्ण प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवले आहे. एक विमान कमी उंचीवर उड्डाण करत होते तर इतर दोन विमाने इच्छितस्थळी उड्डाण करत होती. नागरिकांनी त्यांना ड्रोन समजून पोलिसांना माहिती देण्यासाठी ११२ वर फोन केला. तथापि, ड्रोनची बातमी केवळ अफवा होती.

## बदलापुरात ऑपरेशन अभ्यास मॉक ड्रिल संपन्न

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

पहलगाम हल्ल्यानंतर सर्व राज्यांना मॉक ड्रिल करण्याचे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात आले आहे. त्या आनुषंगाने संकटाच्या परिस्थितीत तयारी आणि प्रतिसादाबाबत आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी 'ऑपरेशन अभ्यास' या मॉक ड्रिल बदलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, सुरवळ चौक, बदलापूर (पूर्व) येथे घेण्यात आले. हे मॉक ड्रिल जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने व प्रांताधिकारी विजयानंद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अमित पुरी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आले.

युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास लॉन्ग सायरन आणि शॉर्ट सायरन्स



या दोन सायरनच्या माध्यमातून काय संदेश दिला जातो एखादी मोठी दुर्घटना घडल्यास किंवा मिसाईल हल्ला अथवा इतर कोणत्याही माध्यमातून हल्ला झाल्यास जखमींना, किंवा एखाद्या ठिकाणी अडकून पडलेल्या नागरिकांना सुरक्षीत स्थळी कसे हलवावे या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठीच्या सूचना देण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने नागरी संरक्षण दल, महसूल विभाग, पोलीस विभाग, कुळगाव बदलापूर नगर परिषद , ठाणे आपत्ती प्रतिसाद दल, अग्नीशमन दल, होमगार्ड आणि अधिकारी या प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. हे प्रात्यक्षिक करताना उल्हासनगरचे उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा, अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी, जिल्हा नागरिक संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शासनाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करावे व नागरिकांनी शासनाला मदत करण्याचा आव्हान यावेळेस अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी यांनी केले.


ग्रामीण, शहरी भगात प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळींना सर्वत्र पसंती

## ग्रामीण भागात पळसाच्या पानांची पत्रावळी जेवणावळीतून हद्दपार

◆ **मुरबाड (प्रतिनिधी) :**

राज्याच्या ग्रामीण भागात विशेषतः ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात तसेच शहर परिसरात विवाह सोहळा, सप्ताह, पूजा व धार्मिक कार्यक्रमात जेवणासाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पळसाच्या पानांच्या पत्रावळी सध्याच्या आधुनिक युगात हद्दपार झाल्याचे चित्र समोर आले आहे. येथील आदिवासी बांधवांना पळसाच्या पानांच्या बनवलेल्या पत्रावळीमुळे या व्यवसायावर एक प्रकारची गदा आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते दिनेश जाधव यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात सर्रास पाहावयास मिळत आहेत. तर आधुनिकीकरणाच्या युगात प्लास्टिक व थर्माकोलच्या पत्रावळींना लग्न सोहळ्यात तसेच धार्मिक कार्यक्रमातर अधिक पसंती मिळत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. विवाह सोहळ्यात व इतर धार्मिक कार्यक्रमात आता पळसाच्या पानाच्या पत्रावळींची जागा थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळीने घेतली आहे. त्यामुळे स्थानिकांचे पत्रावळी तयार करणे व पळसाची पाने जंगलातून आणून व्यापाऱ्यांना विकणे असा छोट्या खानी रोजगार देणारा व्यवसाय मागणी कमी होत असल्याने जवळजवळ बंदच झाला आहे.



पुरातन काळापासून मंगलकार्याच्या जेवण समारंभासाठी पळसाच्या पानांपासून बनविलेल्या पत्रावळींचा वापर केला जात असे. आयुर्वेदीय गुणधर्म असलेली पळसाच्या पानाची पत्रावळी सध्या लोप पावत असून, शहरातील पानटपरीवालेही सध्या पार्सल मावा पळसाच्या पानात बांधून न देता आता कागद किंवा प्लास्टिकमध्ये बांधून देत असल्याने पळसाच्या पानांची मागणी आपोआपच घटली आहे. परिणामी, जंगल परिसरातील स्थानिकांचा रोजगाराचे साधन असलेला हा व्यवसाय बंद झाल्याचे दिसत आहे.

पळसाच्या पानांनी बनविलेल्या पत्रावळीत जेवणाचा स्वाद व रुची अलगच असायचा, असे जुने जाणते वयोवृद्धांच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. कारण पळसाच्या पत्रावळीला आयुर्वेदिक गुणधर्म असल्याने जेवण लवकर पचत असते. अशी विविध गुणधर्म असलेली पळसाच्या पानांची पत्रावळी सध्याच्या स्थितीत हद्दपार झालेली असून, तिची जागा थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळीने घेतली असल्याचे दिसत आहे. पुरातन काळापासून मंगलप्रसंगी जेवण समारंभासाठी पळसाच्या पानांपासून बनविलेल्या पत्रावळींचा वापर केला जात असे. आयुर्वेदीय गुणधर्म असलेल्या पत्रावळी सध्या लोप पावत असून, पानटपरीवालेही सध्या पार्सल, मावा आदी वस्तू पानात बांधून न देता कागद, प्लास्टिकमध्ये बांधून देत असल्याने पळस पानांची मागणी घटली आणि परिणामी जंगलातील आदिवासींच्या रोजगाराचे साधन बंद झाले आहे. जंगलातील पळसाच्या पत्रावळी आदिवासी बांधव तयार करून विकायचा त्यावर आता उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे.




# समतोल व शांत व्यक्तिमत्त्व न्या. भूषण गवई

न्या. भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झाल्यापासून ७०० हून अधिक सुनावण्यांमध्ये भाग घेतला, तर सुमारे ३०० निर्णय दिले आहे. समतोल व शांत स्वभावाच्या न्या. गवई यांनी आक्षेपार्ह घटनांबाबत तीव्र नाराजीसुद्धा व्यक्त केली आहे. मणिपुरातील हिंसाचारानंतर तेथे ते भेट देण्यास गेले होते. तेथील जनतेला मुख्य प्रवाहात आणण्याची आपली जबाबदारी आहे, असे परखड मत त्यांनी मांडले. पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांवरील करमाफी काढून घेण्याचा सरकारला अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट म्हटले होते. ते प्रसिद्धीपासून दूरच राहतात.

सर्वोच्च न्यायालयाचे न्या. भूषण गवई हे १४ मे रोजी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना हे १३ मे रोजी निवृत्त होत असून त्यानंतर न्या. गवई यांना १४ मेपासून अवघ्या सहा महिन्यांचा कालावधी मिळणार आहे. या अवधीत नेमके किती निर्णय ते देतील व त्यापैकी किती सरकार व न्याययंत्रणेला दिशादर्शक ठरतील हे येणारा काळच ठरवेल.

न्या. भूषण गवई यांचे वडील रा. सु. गवई हे रिपब्लिकन पक्षाचे नेते होते. त्यामुळे त्यांना राजकीय पार्श्वभूमी होती. तथापि स्वतःचे वेगळे अस्तित्व त्यांनी कायदा शाखेकडे वळून निर्माण केले. त्यातूनही आज सर्वोच्च पदापर्यंत जाण्याचा मान त्यांना मिळाला. तसेच दलित व्यक्तीचा बहुमान होत आहे ही तितकीच गौरवाची बाब आहे. भारताचे पहिले दलित सरन्यायाधीश म्हणून के. जी. बालकृष्णन यांची १४ जानेवारी २००७ रोजी नियुक्ती झाली होती. तब्बल १८ वर्षांनी न्या. भूषण गवई यांच्या रूपाने दलित समाजातील व्यक्तीला हा सन्मान मिळत आहे. न्या. एम. हिदायतुल्ला, न्या. शरद बोबडे यांच्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी पोहोचणारे न्या. गवई हे नागपूर बार असोसिएशनचे तिसरे वकील आहेत.


**डॉ. सुरेशचंद्र वैद्य**

न्या. गवई हे अमरावतीचे असून १९८५ मध्ये तत्कालिन ज्येष्ठ वकील राजा भोसले यांच्याकडे त्यांनी वकिली व्यवसायाचे मार्गदर्शन घेतले. मुंबई उच्च न्यायालय व नागपूरच्या खंडपीठापुढे १९८७ पासून स्वतंत्र वकिली सुरू केल्यानंतर त्यांनी १९९२ पासून सरकारी वकील म्हणून काम केले. त्याशिवाय ते नागपूर व अमरावती महापालिकेचे वकील होते. सिकॉम आणि विदर्भातील अनेक नगर परिषदांसाठीही त्यांनी काम पहिले होते. नागपुरातील महाराष्ट्र विधी विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. न्या. गवई हे २००३ ते २०१९ पर्यंत म्हणजे १६ वर्षे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते. त्यांची २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झाली. त्यांची आतापर्यंतची कारकीर्द पाहता त्यांच्या कुशाग्र बुद्धीची चुणूक दिसून येते.

सर्वोच्च न्यायालयातही त्यांनी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठामध्ये काम पाहिले. केंद्र सरकारने काढलेले इलेक्ट्रोरल बॉण्ड बेकायदा ठरवून सरकारला दणकाच दिला. मात्र काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय वैध ठरविल्याने भाजपाप्रणीत मोदी सरकारच्या काश्मीरविषयक भूमिकेला बळकटी आली.

न्या. गवई यांनी आरोपीचे घर नोटीस न देता पाडण्याची कारवाई करणाऱ्यांना समज देत ती कारवाई बेकायदा ठरविली.

तसेच जातींमध्ये उपजातींचा समावेश करण्याची प्रक्रिया उचित असल्याचे एका निकालातून स्पष्ट केले. सक्तवसुली विभागाच्या संचालकांना मुदतवाढ देण्याला कॉमन कोज या संघटनेने विरोध केला होता. मात्र प्रशासकीय गरज म्हणून मुदतवाढीचा निर्णय उचित असल्याचा निर्वाळा न्या. गवई यांनी दिला. ॲमेझान फ्युचर रिटेल आर्बिट्रेशन या प्रकरणात परदेशी लवादाने दिलेला निकाल योग्य असल्याचे न्या. गवई यांनी स्पष्ट केल्याने अन्य देशांशी व्यापारी व्यवहार करण्याच्या प्रक्रिया अधिक सुरळीत होण्याला बळ मिळाले. सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांना तुरुंगात डांबून ठेवल्याबद्दल न्या. गवई यांनी तपासयंत्रणेवर ताशेरे ओढत तिस्ता यांना जामीन मंजूर केला. भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणात तक्रारदार फितूर झाला. मात्र केवळ कागदोपत्री असलेला पुरावासुद्धा दंडात्मक कारवाईसाठी पुरेसा असल्याचे न्या. गवई यांच्या खंडपीठाने नमूद केले. यावरून त्यांच्या कायदेविषयक सखोल अभ्यासाची जाणीव होते.

सर्वोच्च न्यायालयातील प्रसिद्ध ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी न्याय यंत्रणेची बेअदबी केल्याबद्दल त्यांना एक रुपया दंड देण्याची शिक्षा देण्याचे धाडस न्या. अरुण मिश्रा, न्या. गवई आणि न्या. मुरारी यांनी दाखविले. लोकशाहीमध्ये संसदच श्रेष्ठ असल्याचे विधान उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी एका भाषणात केले होते आणि सर्वोच्च न्यायालयाने आपल्या मर्यादा ओलांडू नये असा सल्ला दिला. ती बाब लक्षात घेत न्या. गवई यांनी ओटीटी प्लॅटफॉर्मवर अश्लील प्रकार वाढत असल्याच्या याचिकेवर सुनावणी घेताना केंद्राला कोणताही आदेश देण्यास नकार देत याचिकाकर्त्यांनाच सरकारकडे जाण्याचा सल्ला दिला. तेथे काही दाद न मिळाल्यासच पुन्हा येण्यास सांगितले. यावरून सर्वोच्च न्यायालय व संसद हा संघर्ष वाढणार नाही असे दिसते तथापि त्यातून न्याययंत्रणा झाकोळली जाणार नाही याची दक्षता घेतली जावी ही अपेक्षा आहे.

न्या. भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झाल्यापासून ७०० हून अधिक सुनावण्यांमध्ये भाग घेतला, तर सुमारे ३०० निर्णय दिले आहे. समतोल व शांत स्वभावाच्या न्या. गवई यांनी आक्षेपार्ह घटनांबाबत तीव्र नाराजीसुद्धा व्यक्त केली आहे. मणिपुरातील हिंसाचारानंतर तेथे ते भेट देण्यास गेले होते. तेथील जनतेला मुख्य प्रवाहात आणण्याची आपली जबाबदारी आहे, असे परखड मत त्यांनी मांडले.

देशभरातील न्यायालयामध्ये सुमारे पाच कोटी खटले प्रलंबित आहेत. त्यात सर्वोच्च न्यायालयातच ८० हजार आणि उच्च न्यायालयांमध्ये ६० लाख, तर कनिष्ठ न्यायालयात ४.४ कोटी खटले आहेत. यावर काही उपाय करणार आहेत का हा महत्त्वाचा मुद्दा आहे. न्या. गवई यांची कारकीर्द भूषणास्पद व्हावी, अशी अपेक्षा आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या मूळ पक्षातून फुटून एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी वेगळा गट स्थापन केला. निवडणूक आयोगाने त्यांना मान्यता दिल्याने हा वाद सर्वोच्च न्यायालयात दीर्घकाळ अनिर्णित आहे. ते प्रकरण न्या. गवई सुनावणीला घेणार की नाही, अन्यथा त्यांचा सहा महिन्यांचा कालावधी या प्रकरणाला स्पर्श न करताच निघून जाईल का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

प्रहार
कोलाज
रविवार, ११ मे २०२५



# नातवाचे गो-शाळा प्रेम अन् आजोबांची स्वप्नपूर्ती...!

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, विद्यमान रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे खासदार नारायण राणे म्हणजे नव-नवीन संकल्पना सत्यात उतरवणारे व्यक्तीमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. कोणतेही कार्य हाती घेतल्यावर ते अर्धवट सोडत नाहीत. मनातल्या संकल्पनांना प्रत्यक्ष त्याची मांडणी करण्यात नारायण राणे यांना आनंद आणि समाधान लाभते. असाच एक प्रकल्प नारायण राणे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातल्या करंजे गावी उभा केला आहे. अर्थात या प्रकल्पाची संकल्पना खा. नारायण राणे यांच्या नातवाची आहे. अर्थात अभिराज निलेश राणे याच्या गो-प्रेमातून पुढे आली. लहानपणापासून अभिराज मुंबईत असतानाही दररोज न चुकता गाईला चारा देणे हा त्याचा नित्यक्रम बनला. यासाठीच आ. निलेश राणे यांनी दोन गाई मुंबईतून आणल्या आणि अभिराज या गाईंना स्वतः चारा देऊ लागले. नातवाचे हे गो-प्रेम साहजिकच आजोबांच्याही कौतुकाचा विषय होता. यामुळेच कोकणात सिंधुदुर्गात गो-शाळा बांधावी असे खा. नारायण राणे यांनी ठरवले आणि करंजे गावी या गोशाळा प्रकल्पाने आकार घेतला आहे. गो-शाळा प्रकल्पाची २३ एकर जागेत उभारणी करताना खा. नारायण राणे यांनी नेहमीप्रमाणे फारच अभ्यास करून त्याची उभारणी केली आहे. एखादा प्रकल्प खा. नारायण राणे उभा करतात. तेव्हा त्याची भव्यदिव्यता तर असतेच; परंतु त्यातही इतरांपेक्षा वेगळे निर्माण करण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न राहतो. गोशाळा उभारत असताना त्या गोशाळेत सर्व प्रकारच्या जातींच्या गाई आणण्यात आल्या आहेत. १०० गाई आणण्यात आल्या आहेत. गाईंच्या दूधापासून दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती व्हावी यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या प्रकल्पात करण्यात आला आहे. गिरगाय तर आहेच; परंतु त्याचबरोबर देवळी जातीच्या, आपल्याकडील गाईच्या वासरां एवढ्याच वाटणाऱ्या पुंगनूर जातीच्या, उंचीने कमी असलेल्या गाई या गो-शाळेत केव्हाच्याच दाखल झाल्या आहेत. दिसायला अतिशय देखण्या असलेल्या गाईंचे आकर्षण सर्वांनाच आहे. ज्या गाई आजवर कधी पाहताही आल्या नाहीत. त्या गाईंचे दर्शन करंजेतील या गो-शाळेत होणार आहे. करंजे माळरानावर खऱ्या अर्थाने खा. नारायण राणे यांनी नंदनवन उभं केले आहे. २३ एकरच्या या जागेत प्रवेशद्वारापासूनच राणेंच्या कल्पकतेची जाणीव होऊन जाते. गो-शाळेत एक सुबक प्रसन्न वाटावे अशी श्रीकृष्णाची मूर्ती आहे, गो-शाळेतील गाईंच्या राहण्याची खाणपाण्याची व्यवस्थाही तशीच आहे. या मुक्या जनावरांना कोकणातील हवामानाचा कोणताही त्रास होऊ नये याची पूरेपूर काळजी या प्रकल्पात घेतलेली दिसते. गेल्या काही वर्षांत कोकणात गाई, म्हैशी पाळण्याचे प्रमाण ग्रामीण भागातील अनेक गावांतून कमी होत आहे. पूर्वी कोकणातील प्रत्येक घरांच्या पुढे अथवा मागे गुरांचे गोठे असायचे. गोठ्यांमध्ये चार-पाच गाई, बैल जोडी, एक-दोन म्हैशी असायच्या. गुरांच्या शेणातून शेतीला लागणारं शेणखत, गोबरगॅसचा वापर व्हायचा. गुरांच्या संगोपनात इथला शेतकरी रमलेला असायचा. आज कोकणात काही भागात दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्याचा प्रयत्न शेतकरी करत आहेत,


विशेष
**संतोष वायंगणकर**

तर अनेकांच्या घरांशेजारील गोठे असेच आहेत. गेल्या दहा वर्षांत गावो-गावचे हे विदारक पण सत्य आहे. भाकड जनावरांचा प्रश्न गंभीर आहेच.

भाकड गाईंच संगोपन करण्याचा प्रयत्नही या गोवर्धन गो-शाळेतून होणार आहे. करंजे गावातील या गो शाळेच्या परिसरात शेळी, मेंढी पालनाचा प्रकल्पही आहे. या गो-शाळा प्रकल्पात इथे असलेल्या गाईंचे दूध, तूप आणि दूधापासून तयार होणारे पदार्थ इथेच तयार व्हावेत. हा देखील उद्देश ठेवून या प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रक्रिया उद्योगाची उभारणीही आहे. या प्रकल्पात टप्पा-टप्प्याने अनेक गोष्टी घडणार आहेत. अलीकडे कोणत्याही प्रकल्पाची उभारणी करताना आकर्षक वाटण्यासाठी काँक्रीटचे जंगल निर्माण केले जाते; परंतु इथे तर कोकणचे कोकणपण टिकून राहण्यासाठी आंबा, काजू, कोकम, जांभूळ या बरोबरच उंबर, वड, पिंपळ, रुद्राक्ष ही झाड देखील इथे असणार आहेत. वृक्षप्रेमी असलेल्या खा. नारायण राणे यांनी आजकाल दुर्मीळ होत चाललेल्या अनेक वृक्षांना या परिसरात आणून उभं करण्याचा प्रयत्न केला आहे. गाईंना लागणारा ओला चाराही इथेच निर्माण केला जात आहे. पारिजात, शेवंती, आबोली अशी अनेक फुलझाडं या परिसराच्या सौंदर्यात भर घालणारी आहेत. करंजे गावाच्या समोरच सह्याद्रीचा उंचकडा आहे. त्यामुळे इथले सृष्टी सौंदर्य या प्रकल्पाने अधिक देखणे होणार आहे. हा प्रकल्प म्हणजे गो-शाळे पुरता मर्यादित राहत नाही, तर केवळ सिंधुदुर्गातील नव्हे तर कोकणातील एक निसर्ग पर्यटन स्थळ म्हणून निश्चितच नावारुपाला येईल यात कोणतीही शंका नाही. आज शहरी वातावरणाने गुदमरलेली अनेक कुटुंब शांत, निवांतपणा शोधतात. तेव्हा त्यांच्यासाठी हा परिसर खास आकर्षक बनेल. कोणत्याही व्यक्तीकडे केवळ पैसा असून चालत नाही, त्यांच्या पैशांची श्रीमंती ही त्यांच्या-त्यांच्या पूरती मर्यादित राहते. समाजाला त्याचा आदर्श घ्यावा असे काही नसते; परंतु खा. नारायण राणे यांनी आजवर स्वप्नवत वाटणारे अनेक प्रकल्प आणले उभे केले. व्यवसायाच्या,रोजगाराच्या संधी निर्माण केल्या. राणेंवर नेहमीच टीका करणाऱ्यांकडे सांगण्यासारखे, समाजाला दाखवावे असे काहीही उभे करता आलेले नाही. ही वास्तवता कोकणातील जनतेलाही माहीत आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही भागात राणे हा प्रकल्प उभा करू शकले असते; परंतु कोकण हा खा. नारायण राणे यांचा विकपॉइंट आहे. कोकण म्हटलं की ते त्यावर भरभरून बोलतात आणि अनेकवेळा आपलेपणाच्या भावनेने भावूकही होतात. कोकणातील अनेकांनी विविध व्यवसायांत पुढे यावे हाच त्यांचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. करंजे गावी गोवर्धन गोशाळेचा प्रकल्प उभा करतानाही त्यांना वाटत. कोकणातील जनतेने यातून प्रेरणा घेऊन या व्यवसायाकडे वळावे. हाच त्यामागचा उद्देश आहे. खा. नारायण राणे यांनी आजवर स्वतःची पाऊलवाट नव्हे, तर समाजाला मार्गदर्शन होईल असा नवा मार्ग निर्माण करत राहिले आहेत. करंजे गावातील गोवर्धन गोशाळेच्या निर्मितील एक वेगळी किनार आहे. नातू अभिराज निलेश राणे यांच्या संकल्पना आणि आजोबांनी म्हणजे खा. नारायण राणे यांनी ही संकल्पना सत्यात उतरवण्याची स्वप्नपूर्ती केली आहे. असेच म्हणावे लागेल !




# "ऑपरेशन सिंदूर एक शपथ रक्ताने लिहिलेली"

ते क्षण अजूनही काळजावर ओरखडे उमटवतात. पहलगाममध्ये जेव्हा यात्रेकरूंवर भ्याड हल्ला झाला, तेव्हा दहशतवाद्यांनी मुद्दाम पुरुषांना, त्यांच्या पत्नींच्या नजरेसमोर गोळ्या घातल्या.

त्या क्षणी केवळ रक्त सांडलं नाही,

तर सिंदूरही पुसला गेला-सिंदूर म्हणजे सौभाग्याच, मांगल्याच प्रतीक! तेच त्यांनी पुसले होते...

त्या शोकांतिक घटनेनंतर,

ज्या महिलांचे हात थरथरत होते, डोळे वाहत होते,

त्याचं दुःख मौनात बोलू लागलं आणि त्यातून जन्म झाला : "ऑपरेशन सिंदूर"चा.

ही केवळ सैनिकी कारवाई नव्हे,

...तर एका निरपराध स्त्रीच्या विधवा झालेल्या कपाळावर पुन्हा सिंदूर फुलवण्याची शपथ होती.

ते होतं एक उत्तर-निर्घृणतेला मिळालेलं राष्ट्राचं प्रत्युत्तर.

या ऑपरेशनचं नाव "सिंदूर" असणं म्हणजे

एका प्रेमाच्या वियोगात पेटलेल्या क्रोधाची,

आणि मातृभूमीवर झालेल्या जखमेच्या बदल्याची शांत पण असामान्य घोषणा होती.

आता येथे समोर उभे आहेत देशाचे वीर सुपुत्र ज्यांच्या बंदुकीतून निघणारी प्रत्येक गोळी हेच म्हणते...'हा सिंदूर पुन्हा पुसू देणार नाही!'

'ऑपरेशन सिंदूर" ही शब्दकळा हे नावच इतके भन्नाट वाटले आणि अगदी समर्पक!

सारा देश, सारी जनता मॉक ड्रिलच्या तयारीत गुंतली होती आणि पाकड्याला गाफील ठेऊन पहाटे एक वाजता गनिमी कावा खेळून हे 'आपरेशन सिंदूर' यशस्वी झाले!

७ मे २०२५, पहाटेचा काळ. भारताच्या लष्करी इतिहासात हा दिवस एका सुवर्णपानासारखा कोरला गेला. 'ऑपरेशन सिंदूर'. ही कारवाई केवळ एक लष्करी मोहीम नव्हती, तर ती होती भारताच्या संयमाचा, संकल्पाचा आणि सामर्थ्याचा उद्गार.

२२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांचा बळी गेला. भारताने या हल्ल्याचा शांतपणे अभ्यास केला, संयम राखला, त्यानंतर योग्य वेळी योग्य ठिकाणी प्रतिशोध घेतला. अत्यंत अचूक, नियोजनबद्ध आणि केवळ दहशतवाद्यांवर केंद्रित हल्ला.

ऑपरेशन सिंदूर म्हणजे काय?

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, भारतीय हवाई दलाने, लष्कराने आणि नौदलाच्या विशेष पथकांनी मिळून पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर २४ अचूक हल्ले केले. ही त्रिसेनात्मक कारवाई रात्री १. ५ वाजता सुरू झाली आणि काही तासांतच भारताने आपल्या ध्येयावर विजय मिळवला. विशेष बाब म्हणजे या हल्ल्यांमध्ये कोणतीही नागरी हानी झाली नाही. हे भारताच्या मूल्यांवर अधोरेखित करणारे आहे.


**निशा वर्तक**

भारताने या कारवाईतून एक स्पष्ट संदेश दिला. आपण शांतता राखण्याचा पुरेपूर प्रयत्न करू, पण जर कोणी निरपराधांवर हात उचलला, तर आपण शांत बसणार नाही. भारत कुठल्याही प्रकारच्या दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांनाही माफ करणार नाही, हे जगाला कळून चुकलं आहे.

या मोहिमेत सहभागी झालेल्या जवानांनी प्रचंड धैर्य, शिस्त आणि कौशल्य दाखवलं. अशा कारवायांसाठी केवळ युद्धसामग्री नाही, तर असतो तो आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि बलिदानाची तयारी. 'ऑपरेशन सिंदूर' हे त्या सर्व गुणवत्तांचं जिवंत उदाहरण आहे.

जगभरातून भारताच्या या संयमी पण निर्णायक कारवाईचं कौतुक झालं. अनेक देशांनी भारताच्या स्वसंरक्षणाच्या या भूमिकेला पाठिंबा दिला. भारत केवळ एक मोठी अर्थव्यवस्था किंवा लोकशाही नाही, तर जागतिक पातळीवर जबाबदार आणि सक्षम देश आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.

ऑपरेशन सिंदूर म्हणजे भारताच्या रणशौर्याची शपथ. ही कारवाई फक्त प्रतिशोध नव्हती, ती होती न्यायासाठीची लढाई आणि ती लढाई भारताने अभिमानाने आणि प्रतिष्ठेने जिंकली. भारताचा प्रत्येक नागरिक आज गर्वाने म्हणतो आहे. 'जय हिंद'...!

# 'श्याम'ची चटका लावणारी एक्झिट

'श्यामची आई' या प्रथम राष्ट्रपतीपदक विजेत्या मराठी चित्रपटात श्यामची अजरामर भूमिका साकारणारे माधव वझे यांनी इहलोकीची यात्रा संपवली. दर्जेदार अभिनेता, कसबी नाट्यदिग्दर्शक आणि निष्पक्ष नाट्यसमीक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या वझेंनी प्रायोगिक रंगभूमीला मोठे योगदान दिले. चित्रपटांमध्ये अभिनय करताना त्यांनी रंगभूमी हेच आपले पहिले प्रेम असल्याचे दाखवून दिले. या मनस्वी कलाकाराला मानाचा मुजरा.

एखाद्या कलाकाराचा जन्म एखादी खास भूमिका साकारण्यासाठीच व्हावा, अशी नियतीची योजना असू शकते. त्या कलाकाराने एकदा ही भूमिका साकारल्यानंतर पुन्हा त्या भूमिकेत दुसऱ्या कोणत्याही कलाकाराचा विचारही केला जाऊ शकत नाही. अशा काही अगदीच मोजक्या कलाकारांमध्ये माधव वझे यांचं नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. विष्णूपंत पागनीस यांनीही संत तुकारामांची भूमिका अशीच अजरामर करून ठेवली आहे. पण बालवयात 'श्यामची आई'मधला श्याम इतक्या समरसतेने रंगवण्याची ही चित्रसृष्टीच्या इतिहासातील अनोखी घटना म्हणावी लागेल. माधव वझे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाल्यानंतर त्यांचा उत्साही, हसरा आणि निरागस चेहरा डोळ्यांसमोर तरळून गेला. या वयातही पूर्ण कार्यक्षमतेने काम करणारे आणि जिन्याच्या पायऱ्या भरभर उतरून आपली दुचाकी घेऊन सगळीकडे फिरणारे माधव वझे आजही डोळ्यांसमोर दिसतात. 'श्यामची आई' नंतर फारसे चित्रपट न केल्याचे कारण विचारल्यावर ते नेहमी म्हणत, 'श्यामची आई' आणि 'वहिनीच्या बांगड्या' केल्यानंतर वडिलांनी स्पष्ट सांगितलं की आता प्रथम शिक्षण पूर्ण करायचं, पोटापाण्याची व्यवस्था करायची आणि नंतरच चित्रपट आणि नाटकांचा विचार करायचा. अर्थात त्या काळाचा विचार केला तर त्यांचे म्हणणे बरोबरच होते. पण विशेष माधव वझे यांचे वाटते की त्यांनी वडिलांचा सल्ला तंतोतंत पाळला.

माधव वझे यांनी पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम केले. तिथेही ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक ठरले. प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांची कलेची सेवाही सुरू होती. त्यांनी अनेक प्रायोगिक नाटके दिग्दर्शित केली आणि त्यात अभिनयही केला. त्याचवेळी ते जाणकार नाट्यसमीक्षक म्हणूनही नावारूपाला आले. खरे तर आज अवघे कलाविश्व त्यांना साक्षेपी नाट्यसमीक्षक म्हणून अधिक ओळखते. निवृत्तीनंतर मात्र त्यांनी कलेला पूर्णपणे वाहून घेतले. परशुराम देशपांडे यांनी मराठीत रूपांतरित केलेल्या शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. २०१३ मध्ये रंगमंचावर आलेल्या या नाटकात कनक दात्ये आणि नेहा महाजन यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. वझे यांनी राज्य नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदके मिळवली. त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य प्रथितयश नाटककारांच्या नाटकांच्या प्रयोगाचे दिग्दर्शन केले. गोवा येथील कला अकादमीच्या नाट्य विभागामध्ये अभ्यागत प्राध्यापक म्हणून काम करणारे वझे आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे सभासद होते. नाट्य संघाच्या देश-परदेशातील अधिवेशनामध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले. आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाच्या माध्यमातून त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या. त्या दौऱ्यांमध्ये त्या-त्या ठिकाणच्या रंगभूमीचा अभ्यास करण्याचे मोठे काम त्यांनी केले.

प्रासंगिक
**महेश धर्माधिकारी**

देशातील विविध ठिकाणच्या रंगकर्मींना आपल्या या अनुभवाचा फायदा व्हावा असे त्यांना मनापासून वाटे आणि या नवरंगकर्मींना मार्गदर्शन करण्यास ते सदैव तयार असत.'श्यामची आई' शिवाय त्यांनी २००९ मध्ये आलेल्या '३ इडियट्स', २०१६ मध्ये आलेल्या 'डिअर जिंदगी', २०१९ मध्ये आलेल्या 'छप्पर फाड के' अशा काही हदी चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. 'थ्री इडियट्स'मधील आत्महत्या केलेल्या तरूण मुलाच्या वडिलांची भूमिका अगदी काही सेकंदांचीच होती; पण तगड्या अभिनेत्यांच्या गर्दीतही मुलाच्या अंत्यविधीच्या वेळी शोकातिरेकाने रडणारे वडील विशेष लक्षात राहतात, यातच त्यांच्यातील अभिनेत्याचे यश आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान माधव वझे आणि आमीर खान यांच्यात रंगभूमी आणि मेथड अभिनयावर सखोल चर्चा झाली. वझे यांची भेट होण्यापूर्वी आमीर खानने त्यांच्याबद्दलची सर्व माहिती मिळवली होती. त्यावेळी वझे यांनी आमीरला मेथड ॲक्टिंगचे ट्रेनिंग दिले, असेही म्हटले जाते. १९५३ मध्ये 'श्याम' साकारल्यानंतर त्याच वर्षी त्यांचा 'वहिनीच्या बांगड्या' हा दुसरा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटालाही रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यात माधव वझे यांनी छोट्या दिराच्या भूमिकेचे अक्षरशः सोने केले.



अभिनय, दिग्दर्शन आणि नाट्यसमीक्षा याबरोबरच त्यांचे विविध वृत्तपत्र आणि नियतकालिकांमध्ये लिखाण नियमित सुरू होते. पूर्वीच्या लेखकांप्रमाणे तेही कागदावर पेनने लेख लिहीत. पण काळ बदलला त्याप्रमाणे वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या मागणीतही बदल झाला. प्रत्येकाला आता संगणकावर टाईप केलेले लेख हवे होते. वझे यांनी या वयात संगणकावर लेख टाईप करणे आणि नंतर ते संबंधितांना इमेल करणे हे सगळे शिकून घेतले. विशेष म्हणजे याबद्दल त्यांनी कधीही तक्रार केली नाही. एखादी नवी गोष्ट शिकताना त्यांच्या चेहऱ्यावर एखाद्या लहान मुलाप्रमाणे कुतूहलमिश्रित जिज्ञासा दिसायची. उतरत्या वयात या गोष्टी शिकणे बरेच कठीण असू शकते, हे बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना माहीत आहे; परंतु वझे यांनी हे आव्हान कपाळावर एकही आटी येऊ न देता लीलया पेलले. एखाद्या मोठ्या कलाकाराने आत्मचरित्र लिहावे, त्याची जोरदार प्रसिद्धी करावी आणि स्वतःच त्याचे गोडवे गात फिरावे ही सर्वसाधारण प्रथा. पण माधव वझे यांनी लिहिलेले 'श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी' हे आत्मचरित्र याला अपवाद ठरते. एक तर यात कुठेही असामान्य कार्य केल्याचा आव नाही. न समजणाऱ्या, जड शब्दांचा भडीमार नाही. सहजसोपी शैली आणि वाचकाशी संवाद साधत त्यांना गुंतवून ठेवणारे हे पुस्तक एका बैठकीत वाचून काढावे असे आहे.

यातही गंमत अशी आहे की, १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाबद्दल त्यांना आत्ता का लिहावेसे वाटले असेल असा प्रश्न पडतो. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी त्यांनीच या प्रश्नाचे उत्तर दिले होते. ते म्हणाले, आपल्याला आत्मचरित्र किंवा काही आठवणी लिहायच्या असतील, तर त्या प्रामाणिकपणे लिहिता यायला हव्यात. 'श्यामची आई'शी संबंधित काही व्यक्ती हयात असताना आपल्याला वाटते ते जसेच्या तसे लिहिणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी हे पुस्तक इतक्या उशिरा लिहिण्याचा निर्णय घेतला आणि अगदी प्रामाणिकपणे लिहिले, हे वाचताना नक्की जाणवते. या पुस्तकात त्यांनी 'श्यामची आई'च्या चित्रीकरणाच्या वेळच्या अनेक आठवणींना उजाळा दिला आहे. पुण्यातील टिपिकल वाड्यात वाढलेल्या लहानग्या माधवची राहण्याची व्यवस्था मुंबईत अत्र्यांच्या घरी करण्यात आली होती. अत्र्यांच्या घरातले वातावरण मात्र अगदी पाश्चात्य पद्धतीचे होते. त्यामुळे माधवची तिथे काहीशी घुसमट होऊ लागली. त्याच्या अभिनयात अत्र्यांनी पूर्वी पाहिलेली सहजता दिसेना. पर्यायाने कलाकार बदलण्याचा निर्णय घेण्यापर्यंत वेळ आली. शेवटी अत्र्यांच्याच टीममधल्या कोणी तरी त्याला स्वतःच्या घरी एका चाळीसारख्या ठिकाणी राहायला नेले. तिथे गेल्यावर माधवला घरातल्यासारखे वाटले, त्याच्या अभिनयात सहजता आली आणि पुढे इतिहासच घडला.

वनमालाबाईंबद्दलच्या अनेक आठवणीही त्यांनी या पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत. 'भरजरी गं पितांबर दिला फाडून' हे गीत स्वतः प्र. के. अत्रे यांनी लिहिले आहे. हे गीत लिहीत असतानाचा प्रसंग वझे यांनी फारच छान वर्णन केला आहे. कर्जाचे थकलेले हप्ते वसूल करण्यासाठी वसूली अधिकारी आला तेव्हा ते हे गीत लिहीत होते... त्यावेळी माधव वझेही तिथे हजर होते. अत्र्यांनी त्या अधिकाऱ्याला थोडे पैसे काढून दिले आणि पुन्हा गीतलेखनात मग्न झाले. अशा परिस्थितीत इतक्या अवीट गोडीचे गीत त्यांच्या लेखणीतून उतरले, यातच त्यांची प्रतिभा दिसते. आता 'श्यामची आई'मधील सर्व कलाकार इहलोक सोडून गेले आहेत. मध्यंतरी वनमालाबाई गेल्या तेव्हा या टीममधले आपणच मागे उरलो असल्याचे ते म्हणाले होते. आता आईचा लाडका श्यामही त्याच्या आईकडे गेला. ही टीम परलोकी पुन्हा एकत्र आली तर 'श्यामची आई'सारखीच दर्जेदार कलाकृती तिथेही तयार होईल हे नक्की.

# बुद्ध विहारात धम्म संस्कार रुजतात!

सोहळा

## पूज्य भिक्खु धम्मशिल थेरोंची धम्मदेसना







पुण्यभूमी प्रतिनिधी

### रॅली काढून भिमराज नगरात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

बीड: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर मुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सम्यक सम्बुद्ध जयंती औचित्य साधून रविवार रोजी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो, पुज्य भिक्खु डॉ.इंदवंन्स महाथेरो, पुज्य भिक्खु चंद्रमुणी, पुज्य भिक्खु धम्मघोष, पुज्य भिक्खु पय्यावर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून भिमराजनगर राजुरीवेसपर्यंत बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढून भीमराज नगर येथील विहारात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली.

बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, अमरसिंह ढाका,ड भगवान कांडेकर, गौतम चोपडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी समाज बांधवाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय प्रगतीसाठी क्रांती केली. बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म क्रांती केली व दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागताचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी सर्व आंबेडकरी अनुयायाची आहे. बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करून तथागताच्या धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी दर रविवारी उपासक-उपासिका यांनी बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन बुद्ध धम्माचे अनुकरण करणे सर्वांची जबाबदारी आहे. शांतीने जगण्यासाठी बुद्धाच्या तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाच्या पान २ वर

# कळंबमध्ये चोरट्यांनी घर फोडले

## बोंबला:पोलिसांचा तपास कासव गतीने

पुण्यभूमी प्रतीनीधी

कळंब:शहरालगत असलेल्या संभाजी नगर डिकसळ येथे ३ ते ४ मे २०२५ रोजी या दोन दिवसाच्या कालावधीत सतीश प्रल्हाद आडसुळ हे कुटुंबासह त्यांच्या लोहटा पश्चिम गावाकडे मुक्कामी गेल्याची संधी साधून चोरट्यांनी घरातून सोने चांदीच्या दागिन्यांसह रोख असा जवळपास २,०७,७८५ रुपयांचा ऐवज लंपास केला. विशेष म्हणजे मागील काही वर्षापासून शहरात चोरट्यांनी व अवैध धंद्यावाल्यानी धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शहर पोलिसांनी चोरट्यांपुढे नांग्या टाकल्याचे दिसून येते.आता आपल्या मालमत्तेची सुरक्षा नागरिकांनाच स्वबळावर करावी लागणार असल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे. कळंब शहरालगत डिकसळ संभाजी नगर येथील सतीश प्रल्हाद आडसुळ (४२) यांचे घर चोरट्यांनी फोडले आहे.सतीश आडसुळ यांचा फोटोग्राफीचा व्यवसाय असून ते पत्रकार आहेत ते आपल्या कुटुंबा सोबत राहतात ३ मे ते ४ मे दरम्यान ते त्यांच्या मुळ गाव लोहटा पश्चिम गावि गेले असता त्यांच्या राहते घराचे अज्ञात व्यक्तीने दरवाज्याचा कडी कोंडा तोडून घरात प्रवेश करून चोरट्यांनी घरातील कपाटातील ३७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ७,५०० असा एकूण २,०७,७८५ किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला अशा मजकुराची फिर्याद सतीश आडसुळ यांनी दिनांक ६ में २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरे वरून कळंब पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.कलम ३३१(४)३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक हनुमंत कांबळे हे करत आहेत या चोरीचा तपास कासव गतीने तरी चालू आहे का नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे जर पत्रकार यांचे घर फोडुन पाच ते सहा दिवस होउन जर न्याय मिळत नसेल तर सर्व सामान्य नागरिकांचे काय हाल होत असतील असे पत्रकार व नागरीकांमधुन बोलले जात आहे व पोलीस प्रशासनाच्या कामावर नाराजी दिसून येत आहे तसेच पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेलेल्या फिर्यादीला तेथील कर्मचारी उद्धटपणे बोलत आहेत व एक फिर्याद घेण्यासाठी जवळ जवळ दोन ते तीन तास बसावे लागत आहे व फिर्याद घेण्यास पान २ वर

# पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल

## डॉ. गणेश ढवळे:पवनचक्की कंपन्यांची रझाकारी

पुण्यभूमी प्रतिनिधी



पाटोदा:जिल्हा आणि पोलिस प्रशासन पवन आणि सौर ऊर्जा कंपनीच्यांचे हस्तक झालेले असुन कंपन्यांना शेत जमीनीचा ताबा देण्यासाठी पोलिस प्रशासन अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मावेजा मागणा-या शेतकऱ्यांनाच पोलिसी खाक्या दाखवत असुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार पाटोदा तालुक्यात आढळून येत असतानाच पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे, बालाजी शिवाजी शिंदे आणि जेसीबी आपरेटर या तिघांवर ओटु पवनचक्की कंपनीचे कर्मचारी मोहन रामा गाडे यांच्या तक्रारीवरुन भादंवि ११५(२) ,१२६(२),३०८(२), आणि ३०८(३)(५) कामाला विरोध करणे, जाणिवपूर्वक हत्येचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत दाखल करण्यात आल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे.

जर जिल्हा आणि पोलिस प्रशासन शेतकऱ्यांवरच अन्याय करत असेल तर शेतकऱ्यांनी मावेजा मागण्यासाठी कोणाच्या दारात जायचे. पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रत्यक्ष भेटून जनता दरबारात पान २ वर

# राहुरीत खिस्ती भजन स्पर्धा

## उपक्रम:मिरज सांगलीचे सिनाई मंडळ प्रथम




पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:स्नेह सदन चर्च व आराधना भजनी मंडळ डिग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गवासी फा.जेरोम गोनसाल्विस व फा.रमेश त्रिभुवन यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या भव्य राज्यस्तरीय ख्रिस्ती भजन स्पर्धेत महाराष्ट्रातून नामांकित भजनी मंडळ सहभागी झाल्या होत्या. मिरज सांगली भजनी मंडळीने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक२१००० पटकावले

ट्रॉफी सन्मानपत्र शाल श्रीफळ. याचेमानकरी सिनाई भजनी मंडळ मिरज हे ठरलेतर द्वितीय पुरस्कार रुपये १५००० रोख ट्रॉफी सन्मानपत्र शाल श्रीफळ याचे मानकरी आराधना भजनी मंडळ बिडकीन हे तर. तृतीय पुरस्कार रुपये ११००० रोख ट्रॉफी सन्मानपत्र शाल श्रीफळ याचे मानकरी ठरले ख्रिस्त सेवा भजनी मंडळ वाघोली यांनी पटकाविले पान २ वर

# सैनिकाचा एक मॅसेज अन...

## तत्पर:खासदारा कोट्यातून उपलब्ध केले सीट

पुण्यभूमी प्रतिनिधी




बीड:भारताने पाकिस्थानविरूध्द ऑपेरशन सिंदूर सुरू केल्यानंतर भारतीय सैन्य रात्रंदिवस कामाला लागले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठविलेले बरे म्हणून एका सैनिकाने ट्रेनचे बुकींग करण्याचे प्रयत्न केले. परंतु तिकीट मिळत नव्हते. यानंतर सैनिकाने बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना एक मॅसेज केला. यानंतर अवघ्या तिस सेकंदात सोनवणेंनी परत फोन करून समस्या ऐकून घेतली आणि तातडीने रेल्वेबोर्डला पत्र लिहून स्वतच्या कोट्यातील आरक्षीत सीट सैनिकाच्या कुटूंबियासाठी उपलब्ध करून दिली.

पहेलगम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने या दहशतवादी हल्लया बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू केले. यानंतर देशाच्या सिमेवर तणाव निर्माण झाला. अमृतसर येथे अंबाजोगाई तालुक्यातील बाबळगाव येथील विशाल हनंमतराव करपे पाटील हे सैन्यात काम करत आहेत. अमृतसर येथेही ड्रोनहल्ले करण्यात आले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठवावे, असा निर्णय सैनिक असलेले विशाल करपे यांनी घेतला. यानंतर दि.९ रोजी त्यांनी ट्रेन बुकींगसाठी प्रयत्न केले. परंतु सर्वत्र गोंधळाची स्थिती असल्याने ट्रेनमध्ये प्रवाशांची संख्या वाढली. परिणामी, तिकिटाचे बुकींग मिळत नव्हते. दोन दिवस प्रयत्न करूनही तिकिट बुकींग होत नाही, हे लक्षात आल्यानंतर करपे यांनी पान २ वर

# गेवराई शहरात तिरंगा रॅली

## वंचित:सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी रॅली



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई: वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारत-पाक युद्धजन्य परिस्थीतीत भारतीय सैनिकांचे मनोधैर्य उंचाविण्यासाठी गेवराई शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या अदेशावरुन आज दि. ११ मे रोजी संपूर्ण राज्यभर तिरंगा रॅली काढण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार वंचित बहुजन आघाडी तक्रार निवारण समितिचे राज्याध्यक्ष मा. विष्णु जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड व बीड जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर

# नायदेवीत आरओ फिल्टरचे उदघाटन

## उपक्रम:बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस

पुण्यभूमी प्रतिनिधी



नायदेवी: वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष, बहुजन हृदयसम्राट आदरणीय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात स्वाभिमान दिवस म्हणून दरवर्षी मोठ्या दिमाखात साजरा होत असतो. परंतु या वर्षी भारत देशात झालेल्या पहलगाम हल्यामुळे स्वत:हा आदरणीय बाळासाहेब यांनी सांगितल्या प्रमाणे यावर्षी वाढदिवसानिमित्त कोणताही बडेजाव न करता सर्व कार्यकर्त्यांनी पहलगाम येथील दहशतवादी हमल्यात शहीद झालेल्या नागरिकांप्रती संवेदना व्यक्त कराव्या व समाजातील गोर गरिबांची सेवा होईल असे उपक्रम राबवावे, त्या प्रमाणे ग्राम नायदेवी ता.खामगांव येथील सरपंच श्रीमती वत्सलाबाई तायडे यांचे पुढाकाराने गावातील सर्व जाती धर्मातील गावकऱ्यांसाठी आर.ओ. फिल्टर बसविण्यात आले जेणे करून सर्व गावकऱ्यांना शुद्ध पाणी मिळेल.

कार्यक्रमाच्या सुरवातीला पहलगाम येथील शाहिद झालेल्या भारतीय नागरिकांना आदरांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून समाजरत्न तथा वंचित बहुजन आघाडी मुंबई प्रदेशचे साहेबराव तायडे व बुलढाणा जिल्हा नेते समाजभूषण प्रशांत वाघोदे, नागवंशी संघपाल पनाड मेहकर-लोणार विधानसभा नेते यांची होती. यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हा अध्यक्ष मोहितराजे दामोदर, बुलडाणा शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे, चिखली शहर अध्यक्ष बाळासाहेब भिसे, ता.अध्यक्ष संजय धुरंधर, महिला आघाडी मा.जिल्हा उपाध्यक्ष वर्षाताई पान २ वर

# ईटकूर येथे उप डाकघराचे लोकार्पण

## दिलासा:ग्रामस्थांना होणार फायदा



पुण्यभूमी पुण्यभूमी

कळंब:तालुक्यातील ईटकूर येथे दिनांक १० मे २०२५ रोजी उपडाकघर (पोस्ट ऑफिस) या उपक्रमाचा शुभारंभ धाराशिव जिल्ह्याचे खा.ओमराजे निंबाळकर व धाराशिव कळंबचे आ.कैलादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमासाठी श्री. ए.के. शेख (सहायक डाक निदेशक, छ.संभाजीनगर),श्री.संजय आंबेकर (डाक अधीक्षक,धाराशिव),प्रताप काका पाटील,विश्वजीत जाधव, प्रदीप फरताडे,अभय अडसूळ,सौ. मोहरबाई कस्पटे सरपंच,बाळासाहेब गंभीरे, विठ्ठल माने,पवन सावंत,विजू दादा माने, कन्हेरवाडी माजी सरपंच वसुदेव सावंत यांच्यासह डाक विभागातील अधिकारी, कर्मचारी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते हा उपक्रम म्हणजे ग्रामीण भागात पान २ वर

यात्रोत्सव

## हिंदू-मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव

# सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान मौलाली बाबा

पुण्यभूमी प्रतिनिधी





कडा:येथील ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक मौलाली बाबांचा यात्रोत्सव आज सोमवार दि. १२ में पासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे.आष्टी तालुक्यातील हिंदू-मुस्लिम एकोपा जोपासणारं एकमेव गाव म्हणून कड्याचा नावलौकिक आहे. याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो. कडा येथील कडी नदीच्या किनारी सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान मौलाली बाबांची भव्य दर्गाह आहे.

प्रत्येक वर्षी ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या उत्साही वातावरणात बाबांचा हा यात्रोत्सव साजरा करतात. नोकरी व व्यावसायानिमित्त बाहेरगावी असलेले ग्रामस्थ या यात्रेच्या निमित्ताने गावी आवर्जून येतात. बुध्द पौर्णिमेपासून यात्रेस सुरुवात होत अस्ते. पौर्णिमेच्या अगोदर येणा-या बुधवारी मौलाली बाबांना संदल लावतात. हा यात्रोत्सव सोमवार पासून सूरू होत आहे. या दिवशी सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन सवाद्य छबीना मिरवणूक काढतात. बाबांच्या समाधीला आकर्षक फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा गुळ-खोब-याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक आपली इच्छापूर्ती करतात. त्याच दिवशी पहाटे शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते. हा आनंदोत्सव पाहण्यासाठी महिला, पुरुष, बालगोपाळ सहभागी होतात. तर दुस-या दिवशी राज्यभरातून आलेल्या नामवंत मल्लांच्या पान २ वर

# बनसोडेंच्या निधनाने कार्यकर्ता गमावला

## दु:खद:पंकजा मुंडेंनी व्यक्त केल्या शोक भावना

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:भाजपचे नागापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत बनसोडे यांच्या निधनाने आपण सच्चा व अनुभवी कार्यकर्ता गमावला आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

गणपत बनसोडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांचा मुलगा यशपाल बनसोडे व बनसोडे कुटुंबियांचे दूरध्वनीवरून सांत्वन केले. वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे एक निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. ते जिल्हा मध्यवर्ती बँकेचे देखील संचालक होते. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. ते आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते होते, त्यांच्या निधनाने आपल्याला दु:ख झाले आहे, अशा शब्दांत शोक व्यक्त करत ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.